# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ


श्री. द. म. सुकथनकर
(अध्यक्ष)

श्री. मोहन मो. जयकर (सदस्य)

श्री. रमेश दा. सोनी ''

श्रीमती रेखा ग. दिघे ''

श्री. प्रकाश व. कारखानीस ''

श्री. मुकेश र. पटेल ''

श्री. मधुकर द. जोशी ''

श्री. प्रकाश प्र. वैशंपायन ''

श्री. मधुकर ज. गर्दे पाटील ''

श्री. देवकीनंदन शं. सारस्वत ''

श्री. आप्पासाहेब खं. कोते ''

श्री. रायभान ग. चिने (सदस्य)

श्री. भास्कर शं. बोरावके ''

श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील ''

श्री. राजीव पुं. रोहोम ''

श्री. संभाजी कि. काळे ''

श्री. अशोक भि. खांबेकर ''

सौ. प्रेमाबाई सो. बज ''

श्री. रामचंद्र नि. गोसावी ''

श्री. प्रभाकर तु. बोरावके ''

श्री. सोपान मा. धोर्डे ''

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

वर्ष ७५

जुलै-ऑगस्ट १९९८

: संपादक :
**द. म. सुकथनकर**

: कार्यकारी संपादक :
**विद्याधर ताठे**

**: कार्यालय :**

'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी : ४१६ ६५ ५६
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८


: मुद्रक :
**गीता ऑफसेट, मुंबई.**

: टाईपसेटींग :
**देवयानी एन्टरप्रायझेस, मुंबई.**

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी :
रु. १०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखात प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



## अंतरंग


- संपादकीय : विद्याधर ताठे — २
- हेमाडपंतांचे सद्गुरुस्तवन — ४
- साईअनुभव — ५
- साईवंदना (कविता, गीते, भजन) — ८
- साईसंजीवनी : शाम जुवळे — १२
- खरा गुरु कोण ? नानी पालखीवाला — १३
- अविस्मरणीय शिर्डी यात्रा — १६
- शंकरदेशिकाष्टम् : एस. ए. कुलकर्णी — १८
- संताची नामसाधना : डॉ. अशोक कामत — २२
- साईभक्त उद्धवेश (उत्तरार्ध) : के. डी. गडकरी — २५
- सद्गुरु महिमा : कृष्णा तेली — ३०
- सुखाच्या शोधात : भालचंद्र गंद्रे — ३२
- दीनांचा दयाळू : विद्याधर ताठे — ३४
- श्रद्धा : अशोक अर्धापुरे — ३७
- जीवात्म्याकडून परमात्म्याकडे : आदित्य अरुण ताम्हणकर — ३९
- साई उवाच (क्रमश:) : प्र. का. सोमण — ४१
- श्लोकात गीता सार — ४५
- संस्थान प्रकाशित ग्रंथांची सूची — ४६
- आवाहन — ४७

# संपादकीय



**गुरुनाम आणि गुरुसहवास ।**
**गुरुकृपा आणि गुरुचरण पायस ।**
**गुरुमंत्र आणि गुरुसहवास ।**
**महत्प्रयास प्राप्ति ही ॥५८॥**

**सा**ईभक्त हेमांडपतांचे हे विचार विश्वासातील एक त्रिकालाबाधीत सत्य आहे. आपण परिश्रमाने व प्रयत्नाने पैसा मिळवू शकतो, प्रतिष्ठा मिळवू शकतो. एखादे पद मिळवू शकतो. पण केवळ प्रयत्नाने गुरु-गुरुसहवास-गुरुमंत्र लाभत नसतो. फार तर आपण एखाद्या तीर्थक्षेत्री जाऊ शकतो, तेथे सत्पुरुषांना-योग्यांना-महात्म्यांना भेटू शकतो, दर्शन घेऊ शकतो पण त्या महात्म्याच्या कृपेचा लाभ होईलच हे खात्रीने-छातीठोकपणे सांगू शकत नाही. म्हणूनच हेमांडपंत म्हणतात **'महत्प्रयास प्राप्ति ही ।'** हे एक उघड सत्य आहे.

कोणाला केव्हा ? कुठे ? आणि कोणत्या अवस्थेमध्ये गुरु भेटेल हे सांगता येणे कठीण आहे. **हा दैवाचा खेळ निराळा ।** अशी ही दैवयोगाची गोष्ट आहे. ज्ञानेश्वरांना आपला ज्येष्ठ बंधूच गुरु म्हणून लाभला. तर चवदाशे वर्षे योग विद्येने जगलेल्या चांगदेवास, १४ वर्षांची मुक्ताई गुरु भेटली. संत नामदेवांना गुरुसाठी पंढरपूर-आळंदी सोडून थेट आवंढ्यानागनाथ क्षेत्री जावे लागले तर एकनाथमहाराजांना पैठणहून देवगिरीला जनार्दनस्वामींच्या शोधात भ्रमंती करावी लागली होती. संत तुकाराम महाराजांना स्वप्नात गुरुकृपा-अनुग्रह लाभतो. गुरुकृपेवरील त्यांचा अभंग-

**सद्गुरु राये कृपा मज केली ।**
**परि नाही घडली सेवा काही ।**

सर्वत्र प्रसिद्ध आहे. या अभंगात ते म्हणतात- **सापडली वाट जाता गंगेस्नाना ।** म्हणजे नदीला स्नानासाठी जात असताना त्यांना गुरुंचा वरदहस्त लाभला. म्हणजेच कोणाला, केव्हा, आणि कशी **वाट** (गुरुकृपा-अनुग्रह) **सापडेल,** ते सांगता येणे अतर्क्य आहे. म्हणून **'महत्प्रयास प्राप्ति ही ।'** असे म्हणतात.

श्री साईबाबांचे गुरु कोण होते ? त्यांना केव्हा अनुग्रह लाभला ? या गोष्टींबाबत इतिहासाची पाने मौन आहेत. मात्र बाबांच्या गुरुंचे स्थान स्वतः बाबांनीच सर्वांना दाखविलेले आहे व आज शिर्डीमध्ये लिंबवृक्षाखाली स्थित गुरुस्थानाचे दर्शन घेऊन हजारो साईभक्त कृतार्थताही अनुभवित आहेत. **'माझ्या गुरुने माझे कान फुंकलेले नाहीत'** असे बाबांनी गुरुपदेशासाठी धरणे धरून बसलेल्या राधाबाई देशमुख यांना सांगितले. ही 'साईसच्चरित' पोथीतील १८ व १९ व्या अध्यायातील कथा बहुतेक सर्व साईभक्तांना परिचित आहे. साईबाबा त्या बाईस म्हणतात -

**होता पहा माझा गुरु ।**
**मोठा अवलिया कृपासागरु ।**
**थकलो तयाची सेवा करकरूं ।**
**कानमंतरुं देईना ॥४७॥**

मग पुढे बाबांनी आपणास कशी गुरुकृपा लाभली त्यासाठी निष्ठा व सबुरी ही दोन नाणी गुरुस



द्यावी लागली हा वृत्तांत त्या बाईस सांगितलेला आहे.

**निष्ठा आणि सबुरी दोन।**
**हेच ते पैसे, नव्हते आन।**
**म्या ते तेव्हाच टाकीले देऊन।**
**तेणे मज प्रसन्न गुरुमाय ॥५२॥**

साईभक्त हेमाडपंत यांची गुरुभक्ती साईसच्चरित पोथीत, तर संतकवि दासगणूंची गुरुभक्ती त्यांच्या गुरुपाठाच्या अभंगामधून दिसून येते. खरं तर दासगणूंनी वामनशास्त्री इस्लामपूरकर या अधिकारी सत्पुरुषाकडून गुरुपदेश घेतला होता. पण वामनशास्त्री यांनी दासगणूंना **'साईबाबामध्येच तू मला पहा आता तेच तुझे गुरु आहेत'** असा बोध केला आणि पुढे दासगणूंनी सद्गुरु म्हणून श्रीसाईनाथांचे चरणवंदन केले. श्रीसाई हेच त्यांचे मायतात झाले. परमार्थाच्या मार्गावर गुरुची नितांत गरज असते. गुरुमुळेच पारमार्थिक साधना सिद्धीस जातात.

गुरु हा आई-वडिलापेक्षाच नव्हे तर देवापेक्षाही मोठा असतो. देव व गुरु एकाचवेळी समोर आले तर प्रथम मी गुरुचरणाला वंदन करीन असे गुरुमहात्म्य कथन करणारी उत्तर भारतीय संत कबीर यांची कथा प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातील संत तुकारामांचे शिष्य संत निळोबा पिंपळनेरकर यांचीही अशीच कथा प्रसिद्ध आहे. गुरुच्या दर्शनार्थ नामतपाला बसलेल्या निळोबा रायांची निष्ठा-श्रद्धा पाहून देव प्रसन्न होतात आणि त्यांच्यापुढे प्रकट होतात. तेव्हा संत निळोबाराय संतुष्ट होण्याऐवजी देवा म्हणतात तुम्हाला इथे कोणी बोलविले आहे ? मी तुमच्या नव्हे तर माझ्या गुरुच्या दर्शनासाठी नामतपाला बसलेलो आहे. **'निळा म्हणे आम्ही नोळखूचि देवा ।'** हा त्यांचा अभंग चरण गुरुमहात्म्याचे अनन्यसाधारण महात्म्य वर्णन करणारा आहे. कुटुंबसंस्था आणि **गुरुसंख्या** हे भारतीय संस्कृतीचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य आहे. अन्य संस्कृतीत, अन्य देशात अशा संस्था क्वचितच दिसून येतील . म्हणूनच मातृ देवो भव । पितृ देवो भव । प्रमाणेच **गुरुर देवो भव** असे गुरुला भारतीय संस्कृती वंदन करण्यात धन्यता मानते.

गुरु आणि गुरुमहात्म्याबद्ध लिहावे तेवढे थोडे आहे. श्री साईलीलाच्या प्रस्तुत गुरुपौर्णिमा विशेषांकात आम्ही वाचकांसाठी गुरुमहात्म्यपर बरेच साहित्य दिलेले आहे. हा अंकही साईभक्तांनी गोड मानून घ्यावा ही प्रार्थना करून या संपादकीयास पूर्ण विराम देतो.

**गुरुब्रह्म गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वर ।**
**गुरु:साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नम: ॥**

**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक, श्री साईलीला

# हेमांडपंतांचे सद्‌गुरुस्तवन



ॐ नमो सद्‌गुरुराया । चराचराच्या विसाविया ।
अधिष्ठान विश्वा अवघिया । असमी सदया तूं एक ॥४५॥

पृथ्वी सप्तद्वीप नवखंड । सप्तस्वर्ग पाताळ अखंड ।
यांते प्रसवी जें हिरण्यगर्भांड । तेंचि ब्रह्मांड प्रसिद्ध ॥४६॥

प्रसवे जी ब्रह्मांडा यया । जी नामे 'अव्यक्त' वा 'माया' ।
तया मायेच्यियाही पैल ठाया । सद्‌गुरुराया निजवसती ॥४७॥

तयाचें वानावया महिमान । वेदशास्त्रीं धरिलें मौन ।
युक्तिजुक्तींचे प्रमाण । तेथें जाण चालेना ॥४८॥

ज्या ज्या दुज्या तुज उपमावें । तो तो आहेस तूंचि स्वभावें ।
जें जें कांहीं दृष्टि पडावें । तें तें नटावें त्वां स्वयें ॥४९॥

प्रणाम तूंते सर्वोत्तमा । नित्यानंदा पूर्णकामा ।
स्वप्रकाशा मंगलधामा । आत्मारामा गुरुवर्या ॥५१॥

*श्री साईसच्चरित (अध्याय १)*

नमो त्या जन्ममरणनिवर्तका । करुणाघना ज्ञानप्रकाशा ।
वेदगुह्य सच्चित्प्रतिपादका । सर्वव्यापका गुरुवर्या ॥९॥

नमो संसारतमदिनकरा । आत्मानुभवसंतशेखरा ।
भक्त चित्तचकोरचंद्रा । कल्पतरुवर्या गुरुवर्या ॥१०॥

*श्री साईसच्चरित (अध्याय ५०)*

# साई अनुभव



## प्रार्थनेची शक्ती

श्री साईबाबांना मनापासून प्रार्थना केल्यास नक्की यश येतं. परंतु त्यासाठी अढळ श्रद्धा आणि सबुरी हवी. मी माझा मुलगा इंजिनिअरींगच्या (कॉम्प्युटर) परिक्षेत पास व्हावा म्हणून दरवर्षी साईबाबांच्या अकराव्या अध्यायाचे पारायण केले होते आणि प्रार्थना केली की मुलाचा अभ्यास चालू आहे. आपण त्याला प्रेरणा द्यावी आणि यश द्यावे. खरोखरच माझ्या श्रद्धापूर्वक प्रार्थनेला यश आले. साईबाबांच्या कृपेने माझा मुलगा दरवर्षी पास झाला आणि गेल्या महिन्यात त्याच्या शेवटच्या परिक्षेचा निकाल लागून तो पहिल्या वर्गात पास झाला. म्हणून श्री साईबाबांना नवस केल्याप्रमाणे साईलीला मासिकात हा लेख लिहून पाठवित आहे. साईबाबांच्या कृपेने माझ्या मुलाला त्याच्या मनासारखी चांगली नोकरी मिळावी, ही साईचरणी नम्र प्रार्थना.

साईबाबांच्या अकराव्या अध्यायाचे सात दिवस पारायण केल्यास मनाची इच्छा पूर्ण होते. अकरावा अध्याय एकाच वेळी तीन वेळा वाचावा किंवा सकाळ, दुपार, संध्याकाळ असा तीन वेळा वाचावा. उपवास करण्याची आवश्यकता नाही परंतु जेवण शाकाहारी असावे. साईबाबांना सातव्या दिवशी वरण, भात, भाजी व गोड शिऱ्याचा नैवेद्य दाखवावा. रोज साईबाबांची पूजा करून मनातला हेतू सांगून अकरावा अध्याय वाचावा. त्यासाठी श्रद्धा आणि सबूरी हवी. आज ना उद्या यश येईलच.

मला साईबाबांचे बरेच अनुभव आले आहेत. मी एकदा गिरणीत गहू दळण्यासाठी गेले होते. तेथे माझ्या बाजूला बसलेल्या बाईंची प्रथमच ओळख झाली. त्यांच्या बोलण्यावरून असे समजले की, त्यांचे यजमान गेली तीन वर्षे नोकरी नाही म्हणून घरीच आहेत. त्यांची आणि माझी प्रथमच ओळख झाली तरीही सेवाधर्म म्हणून मी त्यांना साईबाबांच्या अकराव्या अध्यायाचे पारायण करण्यास सांगितले. परंतु त्यांच्याकडे साईचरित्र नव्हते. मी त्यांना पत्ता सांगितला आणि साईचरित्र न्यावयास सांगितले. सांगितल्याप्रमाणे त्यांनी अकराव्या अध्यायाचे पारायण केले. बरेच दिवस झाले तरी साईचरित्र त्यांच्याकडेच होते. आणि एक दिवस अचानक त्या साईचरित्र घेऊन आल्या आणि म्हणाल्या की, त्यांच्या यजमानांना नोकरी मिळाली. त्या दोघांनीही साईचरित्राचे पारायण केले. आणि तीन वर्षे घरी असलेले त्यांचे यजमान तीन महिन्यात साईबाबांच्या कृपेने नव्या नोकरीस रूजू झाले.

**– सौ. सुनिता पाटील**

## भक्तरक्षक साई

श्री साईबाबांच्या कृपेने अहमदनगरचे श्री. दामूअण्णा मुंबईच्या पडीत शेअर बाजारापासून व कडधान्याच्या नुकसानीत दलालीपासून कसे बचावले ह्याचे सुरेख वर्णन साईभक्तांनी श्री साई सच्चरित्राच्या पंचविसाव्या अध्यायात वाचलेलं असेलच. तेव्हा सर्व व्यापी श्री साईबाबांनी मुख्यत: मला आणि माझ्या इतर सहकारी मित्रांना एक कोटी वीस लाख रुपयांच्या अस्थिर उद्योगापासून कसे बचावले ह्याचं वर्णन 'श्री साईलीला' मासिकाद्वारे साईभक्तासमोर ठेवतांना श्री

साईबाबांचे अत्यंत आभार मानतो.

ऑगस्ट १९९८ मध्ये माझा एक मित्र माझ्याकडे 'कोका-कोला' व 'पेप्सी-कोला' ह्या अमेरीकन थंड पेयाशी शर्यत करणारे आणखी एका नवीन अमेरीकन थंड पेयाचा गोव्यात 'कॉलेबरेशन'ने उद्योग उभारण्याची 'ऑफर' घेऊन आला आणि म्हणाला की, जर का ही हातात आलेली संधी आम्ही सोडून दिली तर लाखो रुपयाच्या झटपट फायद्याला आम्हाला मुकावे लागेल.

परदेशीय कंपनीचे 'कॉलेबरेशन' म्हटलं म्हणजे, लाखो-कोटी रुपयांची गुंतवणुक ही आलीच, आणि त्यातल्या त्यात माझ्यामागे सतत माझे मित्र लागल्याने शेवटी मी श्री साईबाबावर सर्व काही सोपवून, ह्या 'कॉलेबरेशन' उद्योगामध्ये झोकून घ्यायचं ठरवलं. सदर 'कॉलेबरेश्न'युक्त नव्या पेयाची फॅक्टरी गोव्यात 'साईबाग' ह्या माझ्या जमिनीत उभारायची निश्चित केली, व ताबडतोब 'प्रिलीमनरी प्रोजेक्ट रिपोर्ट' वगैरे तयार करून गोव्याच्या आर्थिक विकास महामंडळ (EDC) व इंडस्ट्रीयल डेव्हलपमेन्ट बँक ऑफ इंडिया (I.D.B.I.) कडून आवश्यक त्या कर्जाची हमी घेतली. आणि सदर परदेशीय उद्योगाचे 'फ्रॅनचायज' हक्क हस्तगत करण्यासाठी माझ्या इतर पार्टनर मित्राबरोबर मुंबईला रवाना झालो.

'कॉलेबरेशन'चे फ्रॅनचायज हक्क हस्तगत करण्याप्रकरणी आम्हालाही त्यावेळी गाजत असलेल्या 'बोफो' प्रकरणासारखाच एक मध्यस्त 'मिडलमॅन' भेटला. सदर 'मध्यस्त' आम्हाला नव्या पेयाची 'कॉलेबरेशन फ्रॅनचायज' हक्क घेण्यासाठीची एकूण फी पाच लाख रुपये पडतील असे सांगायला लागला आणि फक्त आम्हालाच 'शीत पेया'चे फ्रॅनचायज हक्क प्रदान करण्यासाठी आणखी पाच लाख रुपये काळ्या पैशाच्या रुपाने कमिशन म्हणजेच 'किक-बॅक' (Kick-back) पद्धतीने द्यावे लागतील असे म्हणाला. सुरुवातीला जी व्यक्ती सर्व व्यवहार 'स्वच्छ' पद्धतीने कुठलाही आडपडदा न ठेवता केला- जाईल म्हणून आम्हाला सांगायची, त्याच व्यक्तीने अशा गैरप्रकारे केलेल्या व्यवहाराने फारच भडकलो. कारण 'पांढरे पैसे' 'काळे' करण्याची आम्हाला मुळीच गरज नव्हती. माझ्या इतर सहकारी मित्रांना सक्त बजावले की मी 'पांढरे पैसे' 'काळे' करण्याविरुद्ध आहे. ह्यावर माझे पार्टनर मला म्हणाले, की ह्या जगात 'काळे' करून दिल्याशिवाय 'पांढरे' काहीच मिळत नाही, फायदेशीर गोष्टी मिळविण्यासाठी, प्रथम काही गमवावच लागतं. पण मित्रांना सांगितले की, अशा पद्धतीने गमावलेलं मला मुळीच पसंद नाही. शेवटी ते माझे ऐकेनात म्हणाले, आलेली संधी सोडता कामा नये आणि मला पण शेवटी माझ्या मनाविरुद्ध त्यामध्ये सामील व्हावे लागले. पण मी श्री साईबाबांना आर्तप्रार्थना केली की, ह्या झंझाटातून आता केवळ तोच एक मार्गदर्शक होय. नव्या शितपेयाच्या कामासाठी दोन्ही वेळा जेव्हा मी मुंबईला आलो, तेव्हा दोन्ही वेळा शिरडीला श्री साईबाबांकडे धाव घेतली होती, सर्वकाही त्या सर्वशक्तीमान ईश्वराकडेच सोपवण्यासाठी.

नोव्हेंबर १९८७ मध्ये मी आणि माझे पार्टनर मुंबईला सदर परदेशीय उद्योगाच्या 'फ्रॅनचायज' हक्क हस्तगत करण्याविषयी आलो, तेव्हा सदर कंपनीच्या 'कॉलेबरेशन'च्या अधिकाऱ्याकडून आम्हाला धक्कादायक ऐकायला मिळाले, की, आम्हाला प्रथम नियुक्तीत केलेल्या जवळजवळ पन्नास लाख रुपयाची स्वयंचलीत परदेशी यंत्रसामुग्री मिळत नसल्यामुळे त्याच्या ऐवजी दुप्पट क्षमतेची जवळजवळ एक कोटी दहा लाख रुपये किंमतीची यंत्र सामुग्री मिळेल. म्हणजेच सदर 'शीत पेय' कंपनीची उद्योगाची एकूण गुंतवणूक एक कोटी वीस लाख रुपयाऐवजी 'डबल' म्हणजे दोन कोटी साठ लाख रुपये होणार होती. आणि हे सर्व समजल्यावर मी आणि माझे सहकारी पार्टनर गार पडलो. कारण आम्ही केलेल्या मार्केट सर्व्हेप्रमाणे सदर उद्योग एक कोटी तीस लाख रुपयाच्या वर अजिबात परवडणारा नव्हता. आम्ही आणखी वेळ केला नाही जेव्हा ते भल्यासाठी समजून शेवटी आम्ही सर्वांनी त्या 'कॉलेबरेशन'ला राम राम ठोकला आणि विशेष म्हणजे 'किक-बॅक'मुळे 'काळे' होणारे आमचे 'पांढरे' पाच लाख रुपये वाचविले.

नव्या शीत पेयाचे काम आम्हाला मिळाले नाही म्हणून प्रथम फार फार वाईट वाटले. पण नंतर केवळ सहा महिन्यानंतर त्याबद्दल आनंद झाला. भारतात ही कंपनी आल्यानंतर केवळ सहा महिन्यानंतर 'पेप्सी-कोला' ह्या दुसऱ्या अमेरीकन थंडपेयाने प्रवेश केला आणि आमच्यावाल्या कंपनीची हवाच काढून घेतली. पुढे ही कंपनी (आमचीवाली) भारतात मुंबई, बँगलोर, कोचीन इत्यादी ठिकाणी चाललेला उद्योग फारच तोट्यात चालायला लागला म्हणनू बंद करावा लागला.

श्री साईबाबांनी आपल्या हयातीत अहमदनगरच्या श्री दामुअण्णांना मुंबईच्या घडीत शेअर बाजारापासून वाचविले आणि मला व माझ्या साईभक्त मित्रांना आपल्या हयातीनंतर

परदेशीय पडीत उद्योगापासून बचावले. तेव्हा हे त्रिवार सत्य होय की श्री साईबाबा हे स्थूल देहाने जरी आज आमच्यात नाही, तरी ते सूक्ष्म देहाने आमच्यात साईभक्तांच्या भल्यासाठी सतत वावरतात.

**– गणेश बा. नाईक**

## साईभक्तीचा प्रभाव

मी प्रभादेवी येथे रहाणारी सामान्य व्यक्ती, वयाच्या दहा वर्षापासून साईंविषयी श्रद्धा व आपुलकी, परंतु घरात सतत आईवडिलांचे भांडण, वडिल तर लहान गोष्टीवरून कुणकुण करत. तरी पण मनात साईंचेच ध्यान असे व त्यांच्याच नामस्मरणात मी दिवस घालवत असे.

माझ्या भक्तीचे फळ म्हणजे आमच्या सोसायटीमधील नवीन बांधण्यात आलेले साईंचे मंदीर. मनात जाणीवही नव्हती की, ह्या मंदीराची पूजा अर्चा करण्याची जबाबदारी माझ्यावर पडेल.

रोज पहाटे केव्हाही जाग आली की, स्नान करून प्रथम मंदीराकडे धाव असे. अशाच एका पहाटे चार वाजता नकळत इतक्या लवकर मी मंदीर उघडले. मंदीरातील जेव्हा घडयाळ पाहिले तेव्हा समजले की घडयाळात चार वाजले आहेत. अशा प्रकारे भक्तीत मी तल्लीन झालो होतो.

हिवाळा असो वा पावसाळा परंतु इतक्या पहाटे मला मनातूनच कुणीतरी हलवल्यासारखे होत असे. व ही जाणीव करून देत असे की, आपल्याला साईंच्या पूजेस मंदीरात जायचे आहे.

साईंच्या भक्तीत मी अतिशय तल्लीन होऊन गेलो होतो. माझी ह्या वर्षी एस्. एस्. सी. १९९५-९६ ची बोर्ड परीक्षा होती. तरीदेखील मी काही साईंची भक्ती व पूजा-अर्चा करण्याचे सोडले नव्हते. त्याचे फळ मला मिळाले. इंग्रजी या विषयाचा पेपर अतिशय कठीण काढला होता त्याच वर्षी पेपर फुटीचे प्रकरण चालले होते. अशा परिस्थितीत मला समाधानकारक गूण मिळून मी एस्. एस्. सी. पास झालो. तेव्हा मला साईंच्या ह्या बोलाची आठवण झाली.

**जो, जो, मज भजे जैशा जैशा भावे ।**
**तैसा तैसा पावे मी हि त्यासी ॥**

पूजा, अर्चा व साईंची भक्ती मी कदापि सोडली नव्हती. माझ्या वडिलांचे डोके शांत होऊ लागले होते. घरातील आई-वडिलांची हळूहळू भांडणेदेखील कमी होऊ लागली.

गोपाळकाल्याचा तो दिवस अजूनही मला आठवतो. नुसती आठवण आली असता अंगावर शहारे येतात. माझा मोठा भाऊ दहीकाला खेळण्यास गेला होता. तो चवथ्या थराहून थेट डांबरी रस्त्यावर आला परंतु साईच्या कृपेने त्यास जास्त दुखापत झाली नाही. खरं तर हा अपघात जीव घेणारा होता. एवढं मोठं संकट आलं आणि साईनाथांच्या कृपेने ते टाळून गेलं !

**जरी हे शरीर गेलो मी टाकून ।**
**तरी मी धावेन भक्तांसाठी ॥**

कालच घडलेली गोष्ट 'साईलीलाचा गुरुपौर्णिमा विशेषांक' या मार्मिकामधील शेवटच्या पृष्ठावरील 'साईच्या समाधीचा' जो लहान फोटो होता तो मला अतिशय आवडला होता व तो फोटो स्टुडिओमध्ये देऊन मोठा करून तो तसबिरीमध्ये भरायचे असे ठरले. परंतु तो लहान फोटो मोठा करण्यासाठी पैसेही जास्त लागणार होते, तरीही तो फोटो मोठा करणारच असे मी मनात ठरवले.

आईवडील दोघेही कामावर जातात. त्यांचा जेवणाचा डब्बा देऊन तसेच आपण स्टुडिओमध्ये जायचे असे ठरले. परंतु सर्व त्या साईनाथाचीच लीला, आईवडीलांचा जेवणाचा डब्बा घेऊन गेलो, पण तो फोटो सोबत घेतला नव्हता. त्याकरीता पुन्हा मला घरी यावे लागले. फोटो घेतला व पुन्हा स्टुडिओमध्ये जाण्यासाठी पायात चप्पल घालतो ना घालतो पोस्टमनने साईलीलेचा नोव्हें, डिसें. ह्या महिन्याचा अंक हातात सोपवला. मला पूर्वीपासूनच साईलीलाचा अंक मिळाला की त्याच्या पुढील व मागील छापील चित्रे (फोटो) पाहण्याची सवय आहे. तसंच त्याही दिवशी मी तेच केलं. तर मला मोठं आश्चर्यच वाटलं. मी भारावून गेलो आणि मागील पृष्ठावरील तो समाधीचा फोटो मी पहातच राहिलो.

काय हा चमत्कार ? साईंनी मला त्या तसबिरीसाठी जास्त पैसे मोजूनच दिले नाहीत. समाधी मंदिरातील समाधीचा तो फोटो मला हवा होता तेवढ्या मोठ्या मापामध्ये मिळाला जणू काही बाबांनीच तो फोटो मला पाठवून दिला होता.

**नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ।**
**नित्य घ्या प्रचित अनूभवे ॥**

अशाप्रकारे साईंची कृपा आजही आमच्यावर आहे व ती सतत तशीच रहाणार आहे असा माझा दृढ विश्वास आहे.

**– मंगेश नेवरेकर, मुंबई.**

# साईवंदना

## श्रद्धेची पणती

तेलाविण दीप उजळले द्वाराईवरती
अज्ञजनांच्या हृदयीं तेवू दे श्रद्धेची पणती ॥धृ॥

अल्पशलाकेवरी शयन तव नित्य विनायासे
हिमगिरीवरी गौरीहर तू आम्हासी भासे
सदा स्थित शिलधीत परी तव चराचरी वस्ती
अज्ञजनांच्या हृदयीं तेवू दे श्रद्धेची पणती ॥१॥

हिंस्त्रपशूही त्वा उद्धरीले गा माझे आई
दीनजनासी करीसी करुणा नाही नवलाई
भक्तजनांचा भरतो मेळा तुझिया सभोवती
अज्ञजनांच्या हृदयीं तेवू दे श्रद्धेची पणती ॥२॥

हाक ऐकिता रक्षसी सत्वर धाऊनी संकष्टी
शरणागतासी अभय देवूनी वदतो गुजगोष्टी
तुजसम नसे तारक कोणी या अवनीवरती
अज्ञजनांच्या हृदयीं तेवू दे श्रद्धेची पणती ॥३॥

गजेंद्राची हाक ऐकूनी तुची धाव घेसी
नक्रासही समान लेखूनी वैकुंठी नेसी
सत्यव्रताचे करण्या रक्षण अवतरण भूवरती
अज्ञजनांच्या हृदयीं तेवू दे श्रद्धेची पणती ॥४॥

द्रौपदीला तुवा पुरविला वसनांचा साठा
लज्जा रक्षिली भगिनीची हरीला कौरवताठा
अढळपदावरी तुवा स्थापिली ध्रुवाची ज्योती
अज्ञजनांच्या हृदयीं तेवू दे श्रद्धेची पणती ॥५॥

पल्हादासी पाठी घाली वधिला दशशीर
कंस कौरवा केले कंदन, फेडियला भार
देव-मुनीजन स्तविती तुजला ओवाळीत आरती
अज्ञजनांच्या हृदयीं तेवू दे श्रद्धेची पणती ॥६॥

सुधारसासम प्रिय तुज राधाकृष्णेची भाकरी
तशीच भावते मनोमनी माधव-मेघाची चाकरी
तात्या, नाना, बापू, अण्णा भक्त म्हाळसापती
अज्ञजनांच्या हृदयीं तेवू दे श्रद्धेची पणती ॥७॥

करुणामृत पाझरी माई गे दीन अनाथावरी
चरण-प्रयागी स्नान करु दे, वस गे हृदयांतरी
धाव पाव गे साईमाये जीवन-संध्येच्या समयी
अज्ञजनांच्या हृदयी तेवू दे श्रद्धेची समई
अज्ञजनांच्या हृदयी तेवू दे सबुरीची समई ॥८॥

– विश्वनाथ मुरलीधर कुलकर्णी, मलकापूर.

❖ ❖ ❖

## साईनाथ भगवान ?

जय जय साईनाथ भगवान ! ॥धृ॥

तुझ्या कृपेने सूर्य तळपतो
निळ्या अंबरी चंद्र लटकतो
तुझ्या कृपेने प्राप्त होतसे संपत्ती, सन्मान
जय जय साईनाथ भगवान ! ॥१॥

दिसते जे जे उदात्त सुंदर
सकलामाजी तूच निरन्तर
परतत्त्वाते नमुनी गाऊ चिरन्तनाचे गाण
जय जय साईनाथ भगवान ! ॥२॥

लाभताच तव दयार्द्र दृष्टी
ज्ञानसुधेची होईल वृष्टी
अत्यानंदे अध्यात्माचे देऊ जगता ज्ञान
जय जय साईनाथ भगवान ! ॥३॥

विषय-कर्दमी फसता जीवन
अज्ञानातच जाई रंगुन
ज्ञान-फुलांच्या भरो सुगंधे अमुचे हृदयोद्यान
जय जय साईनाथ भगवान ! ॥४॥

– डॉ. विनायक गो. दुर्गे, 'दुर्गेश', नागपूर.

## साईसत्‌चरित्र ग्रंथावरून

जेथे वादावादीची बुद्धी।
तेथे अविद्या माया समृद्धी।
नाही तेथे स्वहित शुद्धी।
सदा दुर्बुद्धी कुर्तकी।

मी म्हणे म्हणता कसे हो।
करील त्याचेच सर्व आहे।
आळशा परी बैसोनी राहे।
दैव साहे कैसे ते।

आपण कोणाचे होऊनी राहावे।
किंवा कोणास आपुले करावे।
याहुनी अन्य असणे न बरवे।
तेणे उतरवी परपार।

सबुरीवरी यशाचा वाटा।
विपत्ती पळवी बाराबाटा।
येथ अविचाराचा काटा।
नाही ठाऊका कोणाही।

कुर्तकाचा करा झाडा।
ना तो करतील मार्गात झगडा।
अभिमान पायातली रगडा।
तरीच पैलतडी पावाल।

क्रोध नाही जयांच्या गांवी।
परमशांती तो अनुभवी।
भुतमात्री जो भगवंत भावी।
कैसी पावावी अविवेकता।

डोळस असता अंध होती।
संग सोडूनी निसंग वर्तती।
तो ही बळे कुसंगे नाडती।
आचरण करीती यथेच्छ।

व्यवहारी पाऊल ठेविता चौकस।
विद्या पावाल अप्रयास।
म्हणूची प्रंपची नसावा आळस।

शसयात्मास नाही निश्चिती।
सदा दोलायमान स्थिती।
त्रिशंकु अवस्था जयाची।
आजन्म सदैव विवंचना।
स्थैर्य लाभेना क्षणेक मना।
मुक्ताच्या वल्गना करताती।

❖ ❖ ❖

## साई तुझे नांव

सांग साई तुझे नांव कोठे नाही
एका पानाच्या दुकानावर
एका किराणा दुकानावर
एका मेडिकल दुकानावर
एका रिक्शाच्या मागील बाजूला,
सांग साई तुझे !!!

एका धोब्याच्या लाँड्रीवर
एका भेळवाल्याच्या हातगाडीवर
एका सिमेंट एजन्सीला
एका कापड विक्रेत्याच्या दुकानावर,
सांग साई तुझे !!!

एका 'साई-निवास' घरावर
एका फळ विक्रेत्याच्या स्टॉलवर
एका दवाखान्याला
एका दुध डेअरीला
सांग तुझे नांव कोठे नाही,
साई साई तुझे !!!

– प्र. बा. पाटील, धुळे.

❖ ❖ ❖

## कर्मभोग-एक गाठोडं गतजन्मीचं

आयुष्य --
गतजन्मी केलेल्या कर्माचं
एक गाठोडं!

ह्या गाठोड्यातून
एकेक कर्मभोग
बाहेर येतो -

सारं निवांत
भोगलं तर
हे गाठोडं
हळूहळू कमी-कमी
होत जातं -

नि सरते शेवटी
सारं गाठोडं
खाली झालं की
देहही खाली पडतो
आत्म्याविना -

मात्र तोपर्यंत
सारं उगी-उगी करित
भोगावं -जुळवून
घ्यावं लागतं -

जर का
आदळ-आपट केलीत
तर कर्मभोग
आणखी उसळतो
फेरे उगीच वाढतात

यापेक्षा निवांत
एकेक कर्मभोग
भोगून पार करावा
त्यातच आपलं शहाणपण
नि भलं विसावलंय

– भालचंद्र केशव गन्द्रे

❖ ❖ ❖

## अंती माझा देह पडावा !

क्षणांत भरले डोळे आणि पाझरली आसवे।
तुझा दुरावा साई आता मजला ना सोसवे ॥१॥

रातदिन मी द्यावी हजेरी तव दरबारी साई।
मनी पुजावे गुरुस्थान अन् तुझी द्वारकामाई ॥२॥

बागेमधले दत्तगुरु नित शनीदेव वंदावे।
मनात माझ्या गणरायाचे मी रूप आठवावे ॥३॥

धुनी, चावडी, खंडोबाचे दर्शन घेतांना।
क्षणात जावे विसरून माझ्या सर्व यातनांना ॥४॥

तुझ्या पुढती मी उभा राहुनी ओवाळीन आरती।
मनी उजळाव्या अगणित माझ्या ज्ञानाच्या ज्योती ॥५॥

मंगलचरणांवर भक्तीने झुकवीन मी माथा।
सार्थक व्हावे ह्या जन्माचे गुरु साईनाथा ॥६॥

श्रद्धा आणि सबुरीचा मी मंत्र कधी स्मरता।
भक्ती सुखाची ठेव अलौकिक ये माझ्या हाता ॥७॥

इथे पोरका आज आणि तू जगताची आई।
पंखामधली ऊब घडीभर मज देऊनी जाई ॥८॥

हिंदू, मुस्लीम, सिख, इसाई- सर्व तुझी लेकरे।
धाऊनी जाशी तुला घालता आर्त स्वरे साद रे ॥९॥

तुझ्या कृपेची मजवर व्हावी शितल बरसात।
अंती माझा देह पडावा साईच्या शिरडीत ॥१०॥

– कु. प्रिया प्रकाश पोतदार, जळगाव.

## मला साईशी भेटवा...

(चाल :- आला थंडीचा महिना...)

याद साईची आली, झटपट शिर्डीशी पाठवा
मला साईशी भेटवा, चरणाचं तिर्थ कुणी चाटवा ॥धृ॥

माझ्या मनात विणलंय, साईच्या भक्तीचं जाळं
काही सुचेना बाई गं, साईच्या भेटीचं वाळं
रोज सपनात येतंय, बाबांच्या प्रितीचं खूळ
त्यांच्यासाठी मी मांडलाय, आताशा संसारी घोळ
झोप लागना बाई ग, अशीच शिर्डीशी पाठवा... ॥१॥

तुमच्यासाठीच आले येणार की माझ्या संगतीनं
दया सोडून घरदार, चला की माझ्या मागणं
असं किती चालायचं, नुसतंच संसारी झुरणं
साई वाचून झालंय, मला की अवघड जगणं
लई वाढलया दुखणं, शिर्डीचा हकीम भेटवा... ॥२॥

साईनाथांची शिर्डी, पावन किती सांगावं ?
हाय दर्शनाशी राव, वर्षातून एकदा आवं
पाया पडून साईचे, भजन तुम्ही गावं
बांधा गळ्यात साईचं, कोरीव देखणं नाव
कसं साईचं लेकरु, 'अनुसूत' दिसतंय येधवा...
मला साईशी भेटवा... ॥३॥

– दीपक उदावंत

# आधुनिक भारुड

भारुड हा काव्य प्रकार अलिकडे अगदीच दुर्मिळ झालेला आहे. त्यामुळे या अंकात मुद्दाम एक भारुड देत आहोत.

नका पाहू ६० वर्षाची वाट
आजच धरा हो मार्ग तो निट
नामस्मरणाची गोडी अविट
व्हाल की आज श्रीहरीचे भाट
निवृत्त व्हा, तुम्ही निवृत्त व्हा
अहंकारातून निवृत्त व्हा
षडरिपूतून निवृत्त व्हा
षडविकारातून निवृत्त व्हा
द्रष्टाचारातून निवृत्त व्हा
निवृत्त व्हा, तुम्ही निवृत्त व्हा ॥१॥

निवृत्त व्हा, तुम्ही निवृत्त व्हा
मोहमायेतून, निवृत्त व्हा विषय वासनेतून
दांभिकपणातून निवृत्त व्हा
अज्ञानातून निवृत्त व्हा
निवृत्त व्हा तूम्ही निवृत्त व्हा ॥२॥

निवृत्त व्हा तुम्ही निवृत्त व्हा
रोगा भोगातून निवृत्त व्हा
रम रमीतून निवृत्त व्हा
स्वार्थी स्वभावातून निवृत्त व्हा
निवृत्त व्हा तुम्ही निवृत्त व्हा ॥३॥

नास्तीकपणातून निवृत्त व्हा
चोरीमारीतून निवृत्त व्हा
ऐय्याशीतून निवृत्त व्हा
भौतीक सुखातून निवृत्त व्हा ॥४॥

ढोंगासोंगापासून निवृत्त व्हा
निंदानालस्तीतून निवृत्त व्हा
अंधश्रद्धेतून निवृत्त व्हा
बुवाबाजीतून निवृत्त व्हा
निवृत्त व्हा, तुम्ही निवृत्त व्हा ॥५॥

गुन्हेगारीतून निवृत्त व्हा
छंद व्यसनातून निवृत्त व्हा
चोंडाळ चौकडीतून निवृत्त व्हा
निवृत्त व्हा, तुम्ही निवृत्त व्हा ॥६॥

फाजील हट्टातून निवृत्त व्हा
व्यर्थ भितीतून निवृत्त व्हा



पळपुटेपणातून निवृत्त व्हा
हिजडेपणातून निवृत्त व्हा
निवृत्त व्हा, तुम्ही निवृत्त व्हा ॥७॥

दुराभिमानातून निवृत्त व्हा
दुष्टचक्रातून निवृत्त व्हा
रावणराज्यातून निवृत्त व्हा
कौरव पणातून निवृत्त व्हा
निवृत्त व्हा, तुम्ही निवृत्त व्हा ॥८॥

जातीभेदातून निवृत्त व्हा
गटबाजीतून निवृत्त व्हा
देशद्रोहातून निवृत्त व्हा
हिंसेतून निवृत्त व्हा
निवृत्त व्हा, तुम्ही निवृत्त व्हा ॥९॥

परदेशी संस्कृतीतून निवृत्त व्हा
दुष्ट संगतीतून निवृत्त व्हा
लालूंगचालनातून निवृत्त व्हा
लाचारपणातून निवृत्त व्हा ॥१०॥

पारतंत्र्यातून निवृत्त व्हा
अस्वच्छतेतून निवृत्त व्हा
हुंडा मागणीतून निवृत्त व्हा
जोमजुलूमांतून निवृत्त व्हा
निवृत्त व्हा, तुम्ही निवृत्त व्हा ॥११॥

प्रदूषणातून निवृत्त व्हा
जंगलतोडीतून निवृत्त व्हा
लोकसंख्यावाढीतून निवृत्त व्हा
नरबळीतून निवृत्त व्हा
निवृत्त व्हा, तुम्ही निवृत्त व्हा ॥१२॥

नका पाहू साठ वर्षाची वाट
आजच धरा हो मार्ग नीट
नामस्मरणाची गोडी अविट
व्हाल की आजच श्रीसाईचे भाट

❑ विद्याधर रिसबुड, डोंबिवली.



# साई संजीवनी

– शाम जुवळे

अखिल सृष्टी अविरतपणे अदृश्य चैतन्याच्या सोबतीने दृश्यरूप धारण करून विश्वदर्शन घडवित आहे. दृश्य आणि दर्शन यांच्या आधारे सृष्टीचे जीवन अस्तित्वात आले आहे. दृश्याचे दर्शन घडविणारा द्रष्टा 'माधव' आजमितीपर्यंत अदृश्यच राहिला आहे. म्हणूनच 'माधव' अनादि-अनंत व नित्य-शाश्वत आहे.

मानव हा दृश्य सृष्टीचा एक अविभाज्य घटक आहे. प्रत्येक घटकात 'माधव' अंतर्यामी म्हणून वसत असतो. 'माधव' हाच सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञानी असल्यामुळे त्यास अंशत: जाणून घेण्यासाठी माधवाचा अंश जो मानव त्यास माधवाने बुद्धीची खास दैव-देणगी देऊन ठेवलेली आहे. मानव अनित्य (क्षणभंगूर) आहे आणि हेच त्याच्या दु:खाचे मूळ आहे. अंशत: ज्ञानाची जाणीव असणे व त्या अंशत: जाणिवेला पूर्णत्त्वाची कला (पौर्णिमा) प्राप्त करून देणे हेच खरे बुद्धीचे कौशल्य आहे. अंशत: असलेले ज्ञान हे अपूर्ण असल्यामुळे अहंकार व अज्ञान निर्माण करण्यास कारणीभुत होत असते. म्हणून अंहकार व अज्ञान हे दोन्ही विकार धोकादायक, तसेच अत्यंत हानिकारकच होत. अज्ञानाने माणूस अनित्यालाच चिकटून जीवनभर गाफील रहात असतो. यामुळे मानवाचे दु:ख कमी न होता सारखे वाढतच असते. याउलट विद्या (ज्ञान) हे खरे धन मानले असून ते धन देत राहिल्याने उणे (कमी) न होता सारखे वाढतच असते. ज्ञानाचा हा उच्चांक होय. मानवाचा दु:ख टाळण्याचा फोल प्रयत्न सपशेल असफल होत असल्यामुळे मानव अधिकच खचला जात असतो. धैर्य खचत गेले असता मानवाच्या या विकाराचा घातक परिणाम विपरीतपणे शरीरावर होत असतो. अज्ञानापासून सुखाची अपेक्षा करीत राहिल्याने मानव कायमचा फसला जात आहे. आशेवर जीवन जगणे वरपांगी गोड वाटत असते. पण परिणामी अशा प्रकारचे आशाळभूतपणाचे जीवन अपयशीच ठरत असते. प्रपंचाची ही रहाटी मानवाला कळत-नकळत अज्ञानी बनवित असते. मायेचा हा खेळ जीवघेणा असला तरी मानवाला त्याचा अनिवार मोह जडलेला आहे, यात संशय नाही. मोहाने मानवाला मगरमिठी मारल्याने मानवाचा अंहकारी 'मी' मानवाला कधीच सोडू इच्छित नाही. प्रपंचातील ही एक जबरदस्त 'भूल' आहे. यामुळे माणूस बेरड व बेदरकार बनला आहे, हे दुर्लक्षित होते, हे सुलक्षण खासच नव्हे.

संसार हा एक अतिभव्य असा महाबाजार आहे. येथील कितीही वस्तू खरेदी केल्या वा येथे कितीही मोठा व्यापारी मान मिळाला तरी मानवाच्या मनाची तृप्ती होत नाही. अतृप्त मन हीच संसारातील महाभयंकर समस्या आहे. संपत्ती, सत्ता, विद्वत्ता वगैरे गोष्टी ही समस्या सोडविण्यास कसलीही मदत करू शकत नाहीत. अशांत मन अतृप्ती वाढवित असते. यामुळे मनात मोठा वणवा पेटत असतो. या वणव्याचे शमन करण्यास विश्वातील कोणतीच संसारी शक्ती उपयोगी पडत नाही. जेव्हा संसाराचा माणसाला वीट येतो, तेव्हा 'माधवा'ची मधूर गोडी त्यास अवीट वाटू लागते. मूळ लेख पहाणे ! लोकांनीच या माधवाचे 'साई' असे नामकरण सहजगत्या केले. लोकांत या पवित्र दर्शनाने 'संजीवनी' निर्माण झाली, तीच ही 'साई-संजीवनी' आज विश्वात अविरतपणे कार्यरत राहिली आहे. जीवाची प्रेमळ जननी तीच ही विश्वाची 'साई-संजीवनी' होय. 'पिंडी ते ब्रह्मांडी' हा सिद्धांत श्रीसाईने सिद्ध करून सुस्पष्ट केला आहे. 'आई ते साई' असे हे समीकरण आहे.

जगात अथपासून इतिपर्यंत सर्वकाही भरडून जात आहे. कशाचाही मागमूस पाठी रहात नाही. जीवाची हाव म्हणजे सरडयाची कुंपणापर्यंतची धाव होय. **''जगी या जे जे दिसते। ते ते अखेर जायाचे ।।''** हा निसर्ग-नियम अपवादरहित आहे. उगाच अहंकार उरी बाळगून जीवनाचे मातेरे करणे अनर्थकारकच होय. संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, मुळात 'मी' व 'माझे' हीच एक जबरदस्त वासना आहे.

**''नम्र झाला भूतां। त्याने कोंडिले अनंता ।।''** हे संत तुकाराम महाराज यांचे अनुभवसिद्ध अमृतबोल फार सखोल व जीवाला आनंद-शांती देणारे आहेत. जीवन ज्या क्षणी संपते त्या 'अमृतक्षणी' जीवाशिवाची जुळवणी होत असते, हा संत ज्ञानेश्वर महाराज यांचा 'अमृतानुभव' साऱ्या जगाने दक्षतापूर्वक अनुकरण करावे असाच आहे, मरणसमयी यातना न होता जीवाने अत्यंत सुखरुपपणे आणि दक्षतेने देहातून माधवासोबत बाहेर पडावे यासारखे जीवन कृतार्थ करणारे अन्य साधन उपलब्ध नाहीच नाही. 'साई-संजीवनी' जीवाच्या सोबत असल्यावर मृत्युचे भय जीवाला असत नाही, हाच 'मृत्युंजय' होय, अमर जीवन ते हेच होय. 'एकमेवा-द्वितीय' असे हे संघटित जीवन होय.

श्री साईचे शाश्वत-शुद्ध प्रेम म्हणजे 'संजीवनी' होय.



# खरा गुरु कोण ?

- नानी पालखीवाला
(प्रख्यात कायदेपंडित)

**परमाचार्य हे मूलत: एका दैवी शक्तीचे प्रतीक होत. सुदैवाने या शतकामध्ये त्यांच्यासारखे उत्तुंग व्यक्तिमत्त्व असणारे रत्न भारतात जन्मास आले. त्यांचे जीवन किंवा आयु वर्षात मोजला येणे शक्य नाही. परमाचार्य कोणी ऋषी किंवा मुनी नव्हेत. ते म्हणजे अत्यंत साधेपणाचे, नम्रतेचे व ऋजु, परंतु प्रचंड नैतिक बल असणारे प्रतीक होत. तामिळ, तेलुगु, मराठी, मल्याळी, हिंदी, इंग्रजी आणि जगातील कितीतरी भाषांवर त्यांचे प्रभुत्व आहे. आज जगात जिकडे-तिकडे पाशवी शक्तीचे प्राबल्य आणि अधिपत्य आहे. या पार्श्वभूमीवर या अगदी किरकोळ शरीरयष्टीच्या, परंतु प्रचंड नैतिक सामर्थ्य असलेल्या, नम्र व शांत परमाचार्यांचे व्यक्तिमत्त्व कमालीचे उठून दिसते. खरा गुरु कोण ? असा श्रीमद् आद्य शंकराचार्यांना प्रश्न विचारला असता त्यांनी उत्तर दिले -**

**''ज्याने अंतिम सत्याचा अनुभव घेतला आहे, आणि जो नित्य आपल्या शिष्याचे कल्याण चिंतितो तोच खरा गुरु होय.''**

१९०७ साली वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी परमगुरुंच्या इच्छेने त्यांना पीठाधिपती करण्यात येऊन कांची कामकोटी पीठाची सूत्रे त्यांनी स्वीकारली, आणि तेव्हापासून त्यांनी स्वत:स विहीत कार्यास संपूर्णतया वाहून घेतले आहे. १९१९ ते १९३९ पर्यंत सर्व भारतभर त्यांनी पदभ्रमण/पदयात्रा केल्या.



मानवाच्या अत्युच्च आकांक्षेचे परमाचार्य हे जणू प्रतीक होत ! मानवी जीवनातील उदात्त विचार महाराजांच्या रुपात प्रतीत होतात. मानसन्मानाबद्दल तर महाराज अगदी उदास असत. कोटी कोटी भक्तांनी त्यांचा वाढदिवस साजरा केला तेव्हा त्यांना आपला मानसन्मान झाला असे मुळीच वाटले नाही. कारण सर्वसंग परित्याग केलेले ते थोर परिव्राजक होत. ते स्थितप्रज्ञ व निर्मोह आहेत. ज्या महापुरुषाने आपले सर्व जीवन केवळ देशाच्याच नव्हे तर अखिल मानवाचे कल्याणासाठी निर्लोभ वृत्तीने समर्पित केले आहे, त्यांचेविषयीची आपल्या मनातील आदरयुक्त भावना व्यक्त करण्यासाठी व त्यांचे सतत स्मरण रहाण्यासाठी असे समारंभ त्यांचे असंख्य भाविक स्वस्फूर्तीने साजरे करतात.

१९२७ साली गांधीजींची परमाचार्यांशी भेट झाली. विविध विषयांवर चर्चा आणि संभाषण झाले. महात्माजी एवढे तन्मय झाले की, राजाजी (राजगोपालाचारी) यांनी भोजनाची वेळ झाली असे जेव्हा महात्माजींना सांगितले त्यावेळी गांधीजी म्हणाले,

''आज मला भोजनाची आवश्यकता नाही. या महान तपस्व्याबरोबर झालेले संभाषण हेच माझे भोजन आहे.'' (महात्माजी नेहमी सूर्यास्तापूर्वी जेवण घेत असत.)

१९७७ साली वॉशिंग्टन येथे भारतीय राजदूत म्हणून जाण्यापूर्वी मला कांचीस जाण्याचा योग आला.

एखाद्या कामगार संघटनेचा मजूरसुद्धा रहावयास तयार होणार नाही अशा अगदी साध्या झोपडीत महाराजांचे वास्तव्य त्या वेळी होते. मनुष्यास जगण्यासाठी अगदी कमीत कमी कॅलरीयुक्त आहाराची जेवढी आवश्यकता आहे, त्याहीपेक्षा अगदी कमी किमी व साधा आहार महाराज घेत असत.

अशा या अगदी सामान्य झोपडीतून महाराज बाहेर आले. अगदी आवश्यक तेवढेच काषाय वस्त्र त्यांनी परिधान केले होते. प्रामाणिकपणा, ऋजुता आणि अलौकिक दिव्य आध्यात्मिक शक्तीचे जणू त्यावेळी साकार झाली होती. या

त्याचा ठसा सर्व उपस्थितांच्या मनावर कायमचा उमटला होता. वातावरणामध्ये त्यावेळी निरव शांतता होती. अशा प्रकारच्या शांततेचा अनुभव फक्त उत्तुंग गिरीशिखरावर किंवा निरभ्र शांत अशा आकाशामध्ये घेता येतो.

कोण्या एका विचारवंताने म्हटले आहे की,

''जो ईश्वराच्या सान्निध्यात जास्तीत जास्त असतो, तो अगदी कमीत कमी स्वत:चा विचार करतो.''

या सत्याचे मूर्त स्वरूप म्हणजेच कांचीचे महाराज होत. आचरणातील त्यांचा कमालीचा साधेपणा अगदी विश्वास ठेवण्यापलीकडचा आहे. आणि त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी तुम्हाला प्रत्यक्ष दर्शनच घ्यावे लागेल.

## आंतरिक परिवर्तन

''भारताच्या आध्यात्मिक रहस्याच्या शोधात'' (ए सर्च इन सिक्रेट इंडिया) हे आपले पुस्तक लिहिण्यापूर्वी पॉल ब्रंटन नावाचे एक प्रसिद्ध ब्रिटीश पत्रकार व लेखक भारतात आले होते. योगायोगाने त्यांची भेट चिंगलपेट (तामिळनाडू) येथे महाराजांबरोबर झाली. त्या वेळच्या चर्चेत महाराज ब्रंटन यांना म्हणाले,

''जगाच्या कल्याणासाठी मानवामध्ये आंतरिक (इनवर्ड ट्रान्स्फॉर्मेशन) आवश्यक आहे. आणि त्यामुळेच जगाचे भले होऊ शकते. हे परिवर्तन मात्र आतून आले पाहिजे.''

योगी अरविंद महर्षींच्या तत्त्वज्ञान/शिकवणुकीमध्ये हेच मुख्य सूत्र सांगितले आहे. आंतरिक परिवर्तनाशिवाय मानवाच्या अस्तित्वाची आणि त्याच्या कल्याणाची सुतराम आशा नाही.

महाराज ब्रंटनसाहेबांना पुढे म्हणाले,

''तुम्ही युद्धनौका मोडीत काढल्या आणि तुमचा दारुगोळा न वापरता कुजवत ठेवला, तरीसुद्धा युद्धे थांबणार नाहीत. कारण मग लोक लाठ्या-काठ्यांनीसुद्धा करतील.''

महाराज आणखी पुढे म्हणाले,

''एकमेकांविषयी सामंजस्य आणि आध्यात्मिक ऐक्याची भावना जर दृढ झाली, तरच सद्भाव वाढेल आणि खऱ्या अर्थाने जगात शांतता लाभेल.''

स्वामीजींचे हे विधान खूपच बोलके आहे. न्युक्लिअर शस्त्रास्त्रे, बॉम्ब, ॲटम बॉम्ब, नष्ट करणे/नसणे म्हणजे युद्ध थांबणे नव्हे. त्यासाठी आंतरिक सुधारणेची/सामंजस्याची नितांत गरज आहे.

नंतर ब्रंटन यांनी महाराजांना पुढे विचारले,

''आपणास असे वाटते का की, मानव दिवसेंदिवस अधोगतीस जात आहे ?''

यावर महाराज उत्तरले,

''मला तसे मुळीच वाटत नाही. कारण प्रत्येक मानवामध्ये ईश्वरी अंश आहे, आत्मा आहे आणि शेवटी तोच अंश खात्रीने मानवास ईश्वराप्रत नेत असतो. महाराज पुढे म्हणाले, ''तुम्ही माणसांना दोष देऊ नका, ते ज्या परिस्थितीत जीवन व्यतीत करत आहेत ती पहा. ती अतिशय वाईट आहे. तरीसुद्धा त्यांना उच्च ध्येयाप्रत नेण्याचा प्रयत्न व्हावयास हवा.'' यावरून ब्रंटनसाहेबांना महाराजांच्या अलौकिक आध्यात्मिक शक्तीची कल्पना आली. या संदर्भात महाराजांचे जीवनात १४/०६/१९३२ साली घडलेली घटना बरेच काही सांगून जाते.

आंध्र प्रदेशमध्ये पदयात्रा करीत असताना महाराज नागारीला गेले. तेथे विद्वानांशी चर्चा करीत असताना एक दूत तार घेऊन महाराजांकडे आला. तार न उघडताच महाराजांनी त्यास विचारले, ''तार कुंभकोणमहून आली आहे काय ?'' (महाराजांच्या मातोश्रींचे वास्तव्य त्यावेळी कुंभकोणमच्या नजिकच्या खेडेगावात होते.) दूताने होकार देताच महाराजांनी त्यास जाण्यास सांगितले आणि उपस्थितांना ते म्हणाले, ''एखाद्या संन्याशाची माता कालवश झाली तर त्याने काय करावयास हवे ?'' त्यांच्या उत्तराची वाटही न पहाता ते शांतपणे उठले आणि नजिकच्या झऱ्यावर जाऊन त्यांनी स्नान केले. त्या तारेत महाराजांच्या मातोश्रींच्या निधनाची वार्ता होती !

महाराजांनी एखाद्या दर्शनार्थी व्यक्तीकडे पाहिले तर खात्री पटते की, महाराज त्याचे अंतरंग जाणतात. आणि गुरुकडून कोणत्या मार्गदर्शनाची त्यास अपेक्षा आहे ते जाणून त्याप्रमाणे ते त्यास मार्गदर्शन करतात.

वसुधैव कुटुंबकम् हीच महाराजांची धारणा असून हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन असा भेदभाव ते कधीच करीत नसत. एवढेच काय भारतीय आणि परदेशीय असाही भेदभाव त्यांच्याजवळ नाही. अखिल मानवजात त्यांना एका कुटुंबाप्रमाणेच आहे.

महाराजांचे शब्दात सांगावयाचे तर ते म्हणतात,

''आपणामध्ये इष्टदेवतेची जी कल्पना आहे ती इष्टदेवता म्हणजेच परमेश्वराचे रूप !''

परमेश्वराप्रत जाण्यासाठी ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणे मूर्त स्वरूपात इष्टदेवतेचे ध्यान करणे, साधना करणे आवश्यक आहे. प्रत्येक साधकाची इष्टदेवता निराळी असू शकेल, परंतु आपल्या आध्यात्मिक साधनेमध्ये तो एकाच परमेश्वराप्रत जातो. **''एकोही देवो केशव: !''** किंवा **''सबका मालिक एक''**, हीच त्याला प्रचिती येते, आणि येथे भेदभाव संपतो. इष्टदेवता भिन्न असल्या तरी 'साध्य' एकच आहे.

थोड्या विस्ताराने सांगावयाचे तर, महाराज म्हणतात त्याप्रमाणे,

परमेश्वर एकच आहे. तो निर्गुण आणि निराकार आहे. पण सामान्य माणूस एकदम भगवंताच्या निराकार स्वरूपाचे चिंतन करू शकणार नाही म्हणून त्याला चिंतनासाठी किंवा ध्यानधारणेसाठी, परमेश्वराचे ठायी चित्ताची एकाग्रता होण्यासाठी, प्रत्यक्ष दिसणाऱ्या मूर्तीची, इष्टदेवतेची, म्हणजेच सगुण उपासनेची आवश्यकता आहे. त्या मूर्तीचे स्वरूप प्रत्येकाच्या आवडीप्रमाणे असेल. चंचल मन साकाराकडून (सगुण) निराकाराकडे (निर्गुण) जावयास हवे ! परमेश्वर सर्वव्यापी आहे, हे सत्य आहे, परंतु ईश्वराचे आराधनेसाठी मूर्तीमध्ये किंवा इष्टदेवतेमध्ये त्याचे अस्तित्व असते, अशी भक्तांची श्रद्धा असल्यामुळे त्यांनी सगुणाकडून निर्गुणाकडे जावयास हवे.

श्री. पालखीवाला पुढे लिहितात,

विभिन्न व्यावसायिकांमध्ये व्यवसायासंबंधी एकमत होणार नाही. परंतु जगामध्ये असा एकच वर्ग आहे की ज्यांच्यामध्ये मतभेद नाहीत आणि तो म्हणजे 'गूढवादी', 'अध्यात्मवादी.' असे लोक ५,००० वर्षांपूर्वीचे असोत किंवा विसाव्या शतकातील असोत, पौर्वात्य असोत, किंवा पाश्चिमात्य असोत, किंवा त्यांची मातृभाषा कोणतीही असो, या सर्वांचा अध्यात्माविषयीचा अनुभव सारखाच असतो, आणि त्यांची शिकवणही सारखीच असते. यावरून अखेर हे स्पष्ट होते की, ''या विश्वाच्यामागे जी एक दिव्य आध्यात्मिक शक्ती आहे, ती मानवामध्येसुद्धा वास करून आहे, पण त्यासाठी तिचा शोध घेऊन त्या शक्तीपासून जी शिकवण मिळते ती आत्मसात करणे जरुरीचे आहे.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. त्यावेळेपर्यंत कांची पीठाची सूत्रे हाती घेऊन महाराजांना ४० वर्षे लोटली होती. तेव्हा त्यांनी भारतीयांना दिलेला संदेश फारच मोलाचा होता. ते म्हणतात,

''अनेक वर्षांच्या पारतंत्र्यानंतर भारत स्वतंत्र झाला. परमेश्वरी कृपा, संतांचे आशीर्वाद आणि भारतीयांचा अद्वितीय त्याग याचेच हे फळ आहे. आपले मनोबल वाढावे आणि आध्यात्मिक प्रगती व्हावी यासाठी आपण परमेश्वराची प्रार्थना करू या ! तोच आपल्यावर कृपावर्षाव करो.''

महाराजांनी आपल्या देशासाठी भरपूर संपत्ती मिळावी म्हणून भगवंताची प्रार्थना करा, असे सांगितले नाही, तर आपले मनोबल वाढून आध्यात्मिक उन्नती व्हावी यासाठी प्रार्थना करावी, असे सांगितले, कारण परमेश्वरी कृपेने मिळालेले स्वातंत्र्य यामुळेच अबाधित राहू शकेल, आणि जगातील इतर मानवांना आदर्श आणि सुखी जीवनासाठी त्यामुळे मदतपण होऊ शकेल.

१९५७ साली आचार्यांची सुवर्ण जयंती झाली त्यावेळी ते म्हणाले,

पीठाची सूत्रे हाती घेऊन आज ५० वर्षे लोटली. परंतु हाती घेतलेले कार्य पूर्ण झाले नाही, संपले नाही आणि स्वीकृत कार्य चालू ठेवण्यासाठी अजून शक्तीपण आहे. आपणास त्या दिशेने खूप वाटचाल करावयाची आहे, कारण काम कधीच संपत नसते.

आणि म्हणूनच कांचीपुरम् (तामिळनाडू) ते सातारा अशी पदयात्रा या परम पुरुषाने केली. कारण त्यामुळे जनसंपर्क साधून ज्या असंख्य भाविकांना महाराजांचे आशीर्वाद घेण्याची तीव्र इच्छा होती त्यांना आशीर्वाद मिळू शकले.

परमाचार्यांचा संदेश मुख्यत्वे प्रेमाचा होता...

O love that will not let me go
I yield my weary soul to thee.
I give thee back the life I owe,
That in thine ocean depths its flow
May richer, purer be.

Article published in 'Bhavan's Journal', 1/6/85.



# एक अविस्मरणीय शिरडी यात्रा

**– साईली**

शिरडीला कधी जायचं असा विचार नेहमीच मनात यायचा. कारण जवळजवळ पाच वर्षे शिरडीला जाण्याचा योग आला नव्हता. एरवी एक किंवा दोन वर्षांच्या अंतराने शिरडीला जाण्याचा योग यायचाच. परंतु या पाच वर्षांत असा योग आला नव्हता. त्यामुळे याबाबत मनात विचार आला की खूप वाईट वाटायचं. शेवटी मात्र तो सोनेरी दिवस उजाडला, दिनांक २७ जुलै १९९७.

दर खेपेप्रमाणे यावेळी रिझर्व्हेशनसाठी आदल्या दिवशी आई दादरहून सुटणाऱ्या मुंबई-शिर्डी एस्. टी.चं रिझर्व्हेशन करायला गेली तर कोणत्याच एस्. टी.चं रिझर्व्हेशन झालेलं नव्हतं. शिरडीला मी, आई व धाकटी बहीण असं तिघीजणीच जायचं ठरलं होतं. त्यामुळे आधी ठरल्याप्रमाणे संध्याकाळी ६.०० च्या एस्. टी.ने न जाता दुपारी ३.०० च्या एस्. टी.ने जाण्याचे ठरले.

पावसाळ्याचे दिवस व रेल्वेचा रविवारी वाढलेला गोंधळ या कारणांमुळे आम्ही दुपारी साडेबारा-पाऊण वाजता घराबाहेर पडलो. हातात सामान असल्याने आई रिक्षाने स्टेशनपर्यंत जाण्याच्या विचारात होती आणि श्री साईबाबांच्या कृपेने आमच्या घराच्या वळणावरच एक रिक्षा येऊन उभी राहिली. अर्थात्‌च आम्ही रिक्षाने स्टेशनकडे गेलो. तिकीट काढून प्लॅटफॉर्मवर पोहचलो तर दादरकडे जाणारी गाडी उपलब्ध नव्हती. दादरकडे जाणाऱ्या गाड्या प्लॅटफॉर्म नं. २ वरून न सोडता ४ वरून सोडण्यात येत होत्या. परंतु बराच वेळ प्लॅटफॉर्म नंबर ४ वरही गाडी न आल्याने बरीच गर्दी झाली होती. गाडीत सामान घेऊन चढता येईल की नाही याबाबत मी साशंक होते. इतक्यात दादरकडे जाणारी गाडी आली व त्यात सगळे लोक चढले. त्यानंतर लागोपाठ दुसरी गाडी आली आणि आम्ही त्यात विनासायास चढलो. काही वेळाने बसायलाही जागा मिळाली. नंतर दादरच्या एस्. टी.स्टँडवर पोहोचल्यावर मुंबई-शिर्डी एस्. टी.ची चौकशी केली असता कंडक्टर म्हणाले, "ती काय, २.०० वाजता सुटणारी एस्. टी. उभी आहे. त्यात बसा.'' त्यावेळी घड्याळाकडे लक्ष गेले तर २.०० वाजायला १० मिनिटे होती. अशा प्रकारे श्री साईनाथांनी सर्व व्यवस्था केली होती. शेवटी त्यांनी बोलावल्याशिवाय जाण्याचा योग नाही हेच खरं.

एस्. टी. दुपारी २.०० वाजता सुटली. पावसाळ्याचे दिवस असल्याने अनेक ठिकाणी धबधबे व त्यात जीवनाचा मनसोक्त आनंद घेत नाचणारी मुले पहायला मिळाली. आतापर्यंत एखाद्या चित्रात किंवा कुठेतरी वाचलेलं निसर्गवर्णन प्रत्यक्षात पाहायला मिळालं. हिरवळ असलेल्या डोंगरातून खळखळ करत खाली येणारं पाणी यासारखं नयनरम्य व सुश्राव्य दर्शन शिरडी यात्रेमुळेच घडलं. प्रवास अगदी मजेशीर झाला. रात्री १०.०० वाजता आमची एस्. टी. शिरडी क्षेत्रात आली.

एस्. टी. स्टँडपासून समाधी मंदिराकडे जात असता श्री साईनाथांच्या शेजारतीचे सूर कानावर पडत होते. खोली घेण्यासाठी शिरडी संस्थानच्या कार्यालयात गेलो तर तेथील कोणतीही खोली रिकामी नसल्याचे सांगण्यात आले व नवीन साईभक्त निवासमध्ये जागा मिळेल असे सांगितल्याने प्रवासाने थकलेल्या अवस्थेत सामान घेऊन अगदी शिरडी संस्थानतर्फे मोफत बससेवा असूनदेखील बसने नवीन इमारतीकडे जायचे जीवावर आले होते. (नवीन इमारतीकडे जाण्यासाठी शिरडी संस्थानतर्फे मोफत बस सेवा उपलब्ध असल्याचे श्री साईलीला मासिकात वाचले होते.) त्यातच मनात विचार आला की श्री साईबाबांनी आपल्याला इतक्या वर्षांनी त्यांच्या शिरडीत बोलावूनही दूर ढकलून दिलं की काय ?

परंतु दुसरा इलाज नव्हता. त्यामुळे बसस्टॉपवर गेलो. तेथे शेजारती संपल्यावर साईभक्तांना घेऊन जाणारी बस उभी होती. आम्ही बसमध्ये चढलो तर बसमध्ये बसायला अजिबात जागा नव्हती. परंतु काहींनी आमच्या हातातील सामान पाहून आम्हाला बसायला जागा दिली. साईभक्त निवासमध्ये पोहोचल्यावर आईने खोली मिळण्यासाठी रांग लावली व मी आणि बहीण सामान सांभाळत बसलो होतो. त्यावेळीदेखील मनातल्या मनात वाईट वाटत होतं. इतक्यात एका पिशवीवर 'You see' असे शब्द मला दिसले. जणू काही श्री साईबाबा सांगत होते; बघ, नवीन इमारत कशी आहे ती !

त्यानंतर तेथील कर्मचाऱ्याने आम्हाला आमच्या खोलीपर्यंत नेऊन सोडले. संडास, बाथरुमची सोय खोलीतच होती व नळाला चोवीस तास पाणी होते. आम्ही हातपाय धुतले व आईने बरोबर घेतलेले खाण्याचे पदार्थ खाऊन झोपलो.

सकाळी उठल्यावर चहा तिथेच मिळणार की नाही याबाबत आम्ही साशंक होतो, परंतु इमारतीतच खाली चहा-नाश्त्याची सोय असल्याने तोही प्रश्न मिटला. चहा पिऊन, शुचिर्भूत होऊन समाधी मंदिराकडे श्री साईनाथांच्या दर्शनाला निघालो. साईभक्त निवासमधून बाहेर पडत असताना त्या इमारतीत प्रवेश केल्यावरच असलेल्या श्री साईनाथांच्या तसबिरीकडे लक्ष गेले. सभोवताली दिव्यांची सुंदर रोषणाई केली होती. ते पाहून प्रसन्न वाटले, नंतर बाहेर पडल्यावर बस उभी नसल्याने चालतच जाण्याचे ठरविले समाधी मंदिर तिथून जवळजवळ २० मिनिटे अंतरावर आहे.

समाधी मंदिरात जाऊन श्री साईनाथांचे दर्शन घेतले व तिथेच थांबून दुपारी १२.०० वाजताची आरती घेतली. नंतर प्रसादालयात जाऊन श्री साईनाथांच्या प्रसादाचे भोजन घेतले व परत जाण्यासाठी बसस्टॉपवर जाऊन उभे राहिलो. काही वेळाने बस आली व आम्ही बसमध्ये चढून साईभक्त निवासकडे निघालो. बस इमारतीजवळ येताच हे लक्षात आलं की बसने हे अंतर फक्त १० मिनिटांवर आहे. तो परिसरही हिरवळीने नटलेला असल्याने रमणीय वाटत होता. संध्याकाळी समाधी मंदिरात जाऊन ७.०० वाजताची आरती घेतली व त्यानंतर प्रसाद भोजन घेऊन घरी परतलो. मनात शेजारती घेण्याची इच्छा होती. पण एवढा वेळ तिथेच बसणे शक्य नव्हते व दुसऱ्या दिवशी सकाळी उठून साईदर्शन घेण्याचा विचार होता. जसजसा घड्याळाचा काटा १०.०० च्या जवळ येऊ लागला तसतशी हुरहूर वाढत होती आणि १०.०० वाजता श्री साईनाथांच्या आरतीचे सूर कानावर पडले. प्रथम ते ऐकून विश्वासच बसेना कारण एवढ्या लांब, समाधी मंदिरापासून २० मिनिटे अंतरावर आरतीचे सुस्पष्ट सूर ऐकायला येणे शक्यच नव्हते. पण नंतर लक्षात आलं की समाधी मंदिरापासून तिथे स्पीकरची योजना करण्यात आली आहे जेणेकरून प्रत्यक्षात समाधी मंदिरात न जाता आरतीच्या वेळी श्री साईनाथांची आरती करता येईल. अर्थात्‌च यामुळे आम्हाला आरतीचा आनंद घेता आला व त्या आनंदातच आम्ही झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी ४.०० वाजता जाग आली. आई आणि बहीण आधीच उठल्या होत्या आम्ही सर्व स्नानादि विधी आटोपून तयार झालो तेव्हा ५.०० वाजण्यास ५ मिनिटे वेळ होता. मी बहिणीला म्हटलं, "आज समाधी मंदिराच्याजवळ जागा मिळाली असती तर आपल्याला काकड आरती सहज मिळाली असती." काकड आरती सुरुवातीपासून मिळण्याची आशा नव्हतीच. परंतु तरीही समाधी मंदिराकडे जाण्यास निघालो. साईभक्त निवासमधून बाहेर पडत असताना बस समोरून निघताना दिसली. आम्ही पळतपळत येताना पाहून तेथील वॉचमनच्या सांगण्यावरून बस ड्रायव्हरने बस थांबवली व आम्ही बसमध्ये चढलो. बस ५.०७ ला बसस्टॉपवर पोहोचली. त्यानंतर तिथून चालत समाधी मंदिरात गेलो तर काकड आरती सुरू झालेली नव्हती. घड्याळात ५.१० झाले होते. बरोबर सव्वापाच वाजता आरती सुरू झाली आणि अशा प्रकारे आम्हाला काकड आरतीचा लाभ मिळाला ही सर्व श्री साईनाथांची कृपा. श्री साईनाथांनी पुन्हा एकदा आपल्या वचनाचा प्रत्यय आणून दिला.

**"जो जो मज भजे जैशा जैशा भावे,**
**तैसा तैसा पावे मीही त्यासी।"**

नंतर आम्ही इतर सर्व देवळांतून देवदर्शन घेऊन, प्रसाद व इतर खरेदी करून चालतच साईभक्त निवासकडे गेलो. साईभक्त निवासची ती इमारत इतकी सुबक आणि सुंदर आहे की ती न्याहाळतच राहावीशी वाटते. एक तर श्री साईनाथांची शिरडी, तेथे साईभक्तांच्या निवासासाठी बांधलेली ती इमारत एखाद्या पंचतारांकित हॉटेलसारखीच आहे. खरंच, साईबाबांनी मुद्दाम त्या इमारतीत वास्तव्य करण्यासाठीच आम्हाला बोलावलं होतं. त्यांचं म्हणणं असावं की 'बघ, माझ्या भक्तांसाठी बांधलेल्या या निवासस्थानात राहून बघ.' कारण त्यापूर्वी श्री साईनाथांच्या शिरडीतील, साईभक्तांसाठी बांधलेल्या साईप्रसाद, शांती निवास, भक्त निवास या इमारतीत जागा मिळाली होती. साईभक्त निवासची ही नवीन जागा पाहता यावी यासाठी श्री साईनाथांनीच हे सारं घडवून आणलं होतं.

परत मुंबईकडे येण्याआधी श्री साईनाथांची आरती घेतली. तेव्हाच श्री साईनाथांचं लांबून दर्शन घेतलं. त्यानंतर प्रसाद भोजन घेतलं आणि निवासस्थानाकडे जाण्याचं ठरलं. पण घरी परत येण्याआधी श्री साईनाथांची अनुमती घेण्यासाठी नी साईनाथांचं जवळून दर्शन घ्यायचं होतं. म्हणून समाधी मंदिरात गेलो. पाहतो तर काय समाधी मंदिरात नेहमीप्रमाणे फार मोठी रांग नव्हती. तसेच ती रांग श्री साईनाथांच्या पादुकांचे दर्शन होईल अशा बाजूने सोडली जात होती. जिथून स्त्रियांची रांग सोडली जात नसे. पर्यायाने श्री साईनाथांच्या पादुकांचे दर्शन होत नसे. ती इच्छादेखील श्री साईनाथांनी पादुकांचे दर्शन देऊन घरी परतण्याआधी पुरी केली.

संध्याकाळी ७.०० ची आरती साईभक्त निवासमध्येच केली आणि रात्री १०.०० च्या एस्. टी.ने मुंबईकडे प्रयाण केले व सुखरुपपणे दुसऱ्या दिवशी सकाळी श्री साईनाथांनी घरी आणलं. श्री साईनाथांच्या अगाध लीलांनी शिरडी यात्रा, एक अविस्मरणीय शिरडी यात्रा ठरली.



# शंकरदेशिकाष्टकम्

- एस्. ए. कुलकर्णी

श्रीमद् आद्य गुरु शंकराचार्य यांच्या चार मुख्य शिष्यांमधील 'तोटकाचार्य' हे अग्रगण्य पट्टशिष्य. त्यांना 'त्रोटकाचार्य' अशीही संज्ञा होती. श्रीशंकराचार्यांनी चारही दिशांना आपले मठ स्थापन केले; त्यापैकी उत्तरेकडील 'ज्योतिर्मठा'चे आचार्य म्हणून आचार्यांनी तोटकाचार्यांची नियुक्ती केली होती. तोटकाचार्यांचे आवडते वृत्त 'त्रोटक वृत्त' होते. या वृत्तामध्ये त्यांनी भरपूर आध्यात्मिक काव्यरचना केलेली आहे. आपले गुरुवर्य श्रीशंकराचार्य यांच्याविषयी आपली हार्दिक कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने त्यांनी 'शंकरदेशिकाष्टकम्' हे स्तोत्र लिहिलेले आहे. या स्तोत्रांतील शब्दरचना अत्यंत सुरेख आहे; ते नित्य आळविण्यास खूप सुलभ आहे; सांगितिक लय या स्तोत्रात आहे. त्यामुळे घरोघरी त्याचे श्रद्धापूर्वक पारायण होत असते. मिरजेतील 'सद्गुरु श्री गजानन महाराज, शेगांव' या 'आरती मंडळा'मध्ये हे स्तोत्र प्रत्येक गुरुवारी म्हटले जाते. तबल्यावरील 'केरवा' ठेक्यात हे स्तोत्र म्हटले जाते व ते खूप प्रभावी परिणामकारक ठरते. या स्तोत्राचा हा काहीसा श्रद्धायुक्त मागोवा.

**विदिताखिलशास्त्रसुधाजलधे**
**महितोपनिषत्कथितार्थनिधे ।**
**हृदये कलये विमलं चरणं**
**भव शंकर देशिक मे शरणम् ॥१॥**

"गुरुदेव, आपण सर्व शास्त्रांचा अमृतमयी महासागार आकळिला आहे. आपण अत्यंक पूज्य, श्रेष्ठ व आदरणीय अशा उपनिषदांच्या अर्थाचा अपूर्व ठेवा सर्व लोकांना उपलब्ध करून दिलेला आहे. मी आपले पुण्यवंत चरण माझ्या अंतःकरणात प्रस्थापित केलेले आहेत. गुरुदेव, मी तुम्हाला शरण आलो आहे, कायिक, वाचिक-मानसिकदृष्ट्या. माझा उद्धार करा महाराज." (जगामध्ये 'सद्गुरुं'चा आधार आध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असतो. संतवर तुकोबाराय यांनी आवर्जून सांगतलेलं आहे- **'सद्गुरुवाचोनि सांपडेना सोय। धरावें तें पाय आधि आधि ॥'** भगवंताच्या स्वरूपाचं सम्यग् ज्ञान फक्त सद्गुरुच देऊ शकतात- हाच भावार्थ इथे आहे.)

**करुणावरुणालय पालय मां**
**भवसागर दुःख विदूनहृदम् ।**



**रचयाखिलदर्शनतत्त्वविदं**
**भव शंकर देशिक मे शरणम् ॥२॥**

"गुरुदेव, आपण करुणासागर आहात. माझं परिपालन करा, स्वामी. या संसारसागरातील दुःखाने माझं हृदय व्यथित झालेलं आहे. आपण माझ्यावर कृपा करा. माझ्या हृदयामध्ये सर्व अष्ट दर्शन तत्त्वे प्रकाशित करा- तसा अनुग्रह असू दे. मला सर्व दर्शने-सर्व शास्त्रे-सर्व तत्त्वे ज्ञात होतील असा आशीर्वाद द्या. माझे अज्ञान दूर होईल असं करा, स्वामी; मी आपल्याला शरण आहे." (अष्टांग योग, अष्टांग तत्त्वदर्शन याद्वारेच मोक्षप्राप्ती होते. सद्गुरुंचा आशीर्वाद लाभला, तरच हे शक्य असते. म्हणून तोटकाचार्य अशी प्रार्थना करीत आहेत. सद्गुरुंचा आधार लाभला की मोक्ष-मुक्तीसाठी इतरत्र जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणूनच म्हणतात- **'सद्गुरुसारिखा असला पाठीराखा। इतरांचा**

**लेखा कोण करी ॥ राजियाची कांता काय भीक मागे। मनाचिया जोगे सिद्धि पावे ॥'** राजाच्या कांतेला, राणीला भीक मागावी लागते का ?)

**भवता जनता सुहिता भविता**
**निजबोध विचारणचारुमते।**
**कलयेश्वरजीव विवेक विदं**
**भव शंकर देशिक मे शरणम् ॥३॥**

''गुरुदेव, आपण जनरसमुदायाचे उत्तम मार्गदर्शकच आहात. सर्वांना सन्मार्ग दाखवून आपण सर्वांचे कल्याण करता. आत्म्याविषयीचा आपला बोध सुरेख व चतुर आहे. जीव आणि शिव या संदर्भात आपण मला विवेकी बनवा. जीवात्मा व परमात्मा याविषयी आपण मला ज्ञान प्राप्त करून आशीर्वादित करा, स्वामी ! आपणच माझे रक्षणकर्ते- माझं रक्षण करा !'' (जीव, काय, आत्मा यांच्याविषयी ज्ञानदेवांनीही वारंवार सांगून असाच बोध दिलेला आहे. **'पैं नामरूप संबधु। जाति क्रिया भेदु। हा आकारासिच अपवादु। वस्तुसि नाही॥ हें उपजे आणि नाशें। तें मायामय असें। यऱ्हवि तत्त्वत: वस्तु असें। अविनाशिचि॥ जैसें पवनें तोय हालविलें। आणि तरंगाकार जालें। तेथ कवणें कोण जन्मलें म्हणों तेथ॥ तेचि वायुचें स्फुरण ठेलें। उदक सदाजें सपाटलें। तरि सांग पां काई निमालें। विचारि पां॥ आत्मज्ञानें चोखडी। संत माझि रुपडी॥'** - वगैरे. नांव, रूप, आकार सारं देहाशी निगडित असतं; आत्म्याशी नाही. वाऱ्याने जलाशयात लाटा निर्माण होतात; वारा थांबला की तेच पाणी सपाट बनतं. म्हणजे जलाशयावर कोणी जन्मत नाही वा मरत नाही. लाटा हा फक्त वरवरचा आभास असतो. हा तत्त्वबोध संत सत्पुरुषच देवू शकतात; कारण संत-सत्पुरुष हे भगवंताचेच दृष्टांते असतात. तोटकाचार्यांना याच बोधाची दीक्षा हवी आहे गुरुवर्याकडून)

**भव एव भवनिति मे नितरां**
**समजायत चेतसि कौतुकिता।**
**मम वारय मोहमहाजलधिं**
**भव शंकर देशिक मे शरणम् ॥४॥**

''गुरुदेव, आपण साक्षात् श्रीशंकरच आहात. म्हणूनच माझ्या मनाला तुमच्या सहवासात भरपूर आनंद वाटतो; आपल्या सान्निध्यात मन उत्साही बनतं. माझा मायेचा मोहरूपी महासागर कृपया, आपणच दूर करा; यथार्थ आत्मस्वरूपाचं मला ज्ञान प्राप्त करून द्या. स्वामीजी, मी आपल्याला सर्वस्वी शरण आलो आहे. माझं रक्षण करा.'' (सद्गुरुंना सर्वभावें शरण गेलं की काय बदल होऊ शकतो, याचं नेमकं निधान तुकोबारायांनी सांगितलेलं आहे - ते असं - **'उजळलें भाग्य आता। अवघी चिंता वारली॥ संतदर्शनें हा लाभ। पद्मनाभ जोडिला॥'** समर्थ रामदास म्हणाले, **'संत आनंदाचे स्थळ। संत सुखचि केवळ। नाना संतोषाचे मूळ। ते हे संत॥ संत विश्रांतिची विश्रांति। संत तृप्तीची निजतृप्ती। नातरि भक्तिची फलश्रुति। ते हे संत॥ संत समाधीचें मंदिर। संत विवेकाचें भांडार। नातरि बोलिजे माहेर। सायुज्यमुक्तिचे॥'** याच दृष्टिकोनातून तोटकाचार्य जगद्गुरु श्री शंकराचार्यांपुढे मागणी करीत आहेत.)

**सुकृतेऽधिकृते बहुधा भवते**
**भविता पददर्शनलालसता।**
**अतिदीनमिमं परिपालय मां**
**भव शंकर देशिक मे शरणम् ॥५॥**

''गुरुदेव, मला माहीत आहे - ज्याला पुण्यकर्माचे बळ प्राप्त झालेलं असेल, त्याच्या ठायीच आपल्या चरणकमलांच्या दर्शनाची ओढ लागते. ज्याच्या ठायी पुण्य नसेल, त्याला आपल्या दर्शनाची उत्कंठा वाटणे शक्यच नाही. ज्यांना आपली जवळिक लाभली, त्यांच्या भाग्याचं वर्णन कसं करता येईल ? स्वामी, मी अति दीन आहे; आपणच माझं रक्षण करावं. मी आपल्याला भक्तिपूर्वक शरण आलो आहे. माझा उद्धार करा - मी धन्य धन्य होईन.'' (तुकारामांचा एक अभंग हेच आवर्जून सांगतो - **'संत चरण रज लागतां सहज। वासनेचं बीज जळुनि जाय॥ मग रामनामीं उपजें आवडी। सुख घडोघडीं वाढूं लागे॥ कंठी प्रेम दाटें। नयनीं नीर लोटे। हृदयीं प्रगटें रामरूप॥** - शेवटी अट सांगितलेली आहे - **'तुका म्हणें साधन सुलभ गोमटें। परि उपतिष्ठें पूर्व पुण्य॥'** काही पुण्य पदरात असेल तर संतांची भेट होऊ शकते व संतबोधाने मुक्ती लाभते - ईश्वराशी तादात्म्य प्राप्त होतं. वाल्याकोळ्याला नारदमुनी भेटले अन् मग वाल्याचा वाल्मिकी झाला. कबीराला रामनंद महाराजांचे पाय लागले चुकून. त्यांच्या चरणाचा स्पर्श व्हावा म्हणून कबीर घाटाच्या पाथरीवर भल्या पहाटे आडवे झोपले होते. महाराजांचा पदस्पर्श झाला अन् कबीराचा 'महात्मा कबीर' झाला. शिवपिंडीवरचा पाय उचलून दुसरीकडे ठेव, असं विसोबा खेचरानी नामदेवांना सांगितलं - त्या घडामोडीतच नामदेवांना आत्मज्ञान-परमात्मज्ञान प्राप्त झालं. 'सावधान' या एका शब्दाने नारायणच पुढे समर्थ रामदास बनले नाही का ?)

**जगतीमवितुं कलिताकृतयो**
**विचरन्ति महामहसश्छलत:।**

**अहिमांशुरिवात्र विभासि पुरो**
**भव शंकर देशिक मे शरणम् ॥६॥**



''गुरुदेवा, परमेश्वराच्या विभूती नाना रुपें धारण करून मोठ्या तेजस्वी स्वरूपात जगात वावरत असतात - विहरत असतात, ते विश्वसंरक्षणासाठीच. परंतु आपण मात्र मला प्रत्यक्ष सूर्याप्रमाणे महान तेजस्वी असेच भासता. (दुसरा अर्थ :- शारदीय पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे मला आपण आल्हाददायक व नयनमनोहर असेच दिसता.) स्वामी, मी आपल्याला शरण आलो आहे. माझं रक्षण करून कृतार्थ करा मला.'' (भगवद्गीतेमध्ये श्रीकृष्णाने अर्जुनाला आपल्या विभूती प्रथम सांगितल्या; नंतर आपले विराट स्वरूपही प्रत्यक्ष दाखविले. तेव्हा अर्जुनाला म्हणावे लागले, **'अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्टवा । तदेव मे दर्शय देव रूपं प्रसीद देवेश जगन्निवास ॥ किरीटीनं गदिनं चक्रहस्त - मिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव । तेनैव रूपेण चतुर्भुजेने सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥'** अर्जुनाला ते विराट रूप पेलवेना. **'हे विश्वरूपाचे सोहळे । भोगूनिया निवाले डोळे । आतां होंताति आंधळे । कृष्णालागि ॥ तें कृष्णरूपडें- । वांचूनि पाहो आन आवडे । तें नदेखतां थोडें । मानिताति हे ॥'** असं ज्ञानदेवांनी विवरण केलेलं आहे. याच पद्धतीने इथे तोटकाचार्यांनी गुरुवर्य श्रीमद् शंकराचार्यांची भक्तिपूर्वक प्रार्थना केलेली आहे. भगवंताचं सत्य स्वरूप अगम्य, अगोचर, अचिंत्य व अनाकलनीयच आहे. परंतु संत-सत्पुरुष मानवी असूनही ईशरूपी असतात. ज्ञानदेव सहाव्या अध्यायात विवरण करतात - **'आगा योगी जो म्हणिजे । तो देवांचा देवो जाणिजे । आणि सुखसर्वस्व माझें । चैतन्य गा ॥ जेया भजतां भजन भजावें । हें भक्तिसाधन जें आघवें । ते मी चि जाला अनुभवें । अखंडिता ॥'** संत, सत्पुरुष, कर्मयोगी, ज्ञानयोगी, भक्तियोगी हे सारे देवांचे देव असतात; ईश्वराचंच ते चैतन्य असतं. याच अनुभूत दृष्टिकोनातून तोटकाचार्य श्रीमद्शंकराचार्यांच्याकडे भक्तिपूर्वक प्रार्थना करतात. मुस्लिम ईश्वराला 'अल्लाह' मानतात व महंमदांना 'पैगंबर' मानतात. ख्रिस्ती देवाला मानतात आणि जिससला 'प्रेषित' मानतात. याचा अर्थ एकच की संत-सत्पुरुष हे ईश्वराचंच 'प्रतिबिंब' असतात. संतांचं वर्णन करताना ज्ञानदेव म्हणतात- **'तें आनंदाचे अनुकार। सुखाचे अंकुर। किं महाबोधें विस्तार। केले जैसे ॥ ते विवेकाचें गांव। किं परब्रह्मिचे स्वभाव। ना तरि अलंकारले अवयव। ब्रह्मविद्येचे ॥ ते सत्वाचे सात्विक। किं चैतन्याचे आंगिक। हे बहु असो एकैक। वानिसि काइ ॥'** (अ.५) 'ऑब्जेकट' आणि 'इमेज' असा हा साधार संबंध ओळखूनच तोटकाचार्यांनी आपली भावना या श्लोकात व्यक्त केलेली आहे. ज्ञानदेवांनी चौदाव्या अध्यायात 'जाणीव भक्ती'चा उल्लेख अनेक दृष्टांतांनी केलेला आहे. **'कां द्रवपण तेचि नीर। अवकाशु तेचि अंबर। गोडी तेचि साकर। आन नाही ॥ वन्हि तेंचि जाळ। दळ तोंचि कमळ। रुंखु तेंचि डहाळ। फलादिकं ॥'...** वगैरे. द्रवता व जल, अवकाश व आकाश, साखर अन् गोडी, अग्नि अन् आग, पाकळी अन् कमळ, वृक्ष आणि फांद्या-फळे, थिजलेलं तूप आणि द्रवरूप तूप, सोने व अलंकार, घट अन् माती, धागा अन् वस्त्र आदीमध्ये फरक तो काय असतो ? **'ऐसिनि जें जाणिजे। तें जाणिव भक्ति म्हणिजे। एथ भेदु तरि देखिजे। व्यभिचारु तो ॥'** ईश्वर आणि संत असे एकरूप असतात; ते जाणणं म्हणजेच 'जाणीव भक्ती'; त्यात फरक केला तर तो 'व्यभिचार', असं ज्ञानदेवांचं स्पष्ट मत आहे. तोटकाचार्य (शंकराचार्यांकडे याच योग्य दृष्टीने पाहतात.)

**गुरुपुंगव पुंगवकेतन ते**
**समतामयतां नहि कोऽपि सुधी: ।**
**शरणागतवत्सल तत्त्वनिधे**
**भव शंकर देशिक मे शरणम् ॥७॥**

''गुरुदेव, आपण परमश्रेष्ठ गुरु आहात; श्रेष्ठांचे तुम्ही अधिष्ठान आहात. आपली बरोबरी करू शकेल असा अन्य श्रेष्ठ गुरु संभवतच नाही. शरणागतांना आपण वात्सल्यपूर्वक जवळ

घेता. तत्त्वज्ञानाचे आपण महोदधि आहात. म्हणूनच मी आपल्याला सर्वभावे शरण आलो आहे. स्वामी, माझं रक्षण करा.'' (हा श्लोक म्हणजे गुरुनिष्ठेचं साद्यंत प्रतीक आहे. 'गुरु' हा शब्दाचा अर्थच मुळी 'अज्ञान-अंध:काराचा नाश करणारा' असा आहे. **'अज्ञानांध:कारस्य रूपस्य ज्ञानांजन शलाकया।'** अज्ञान ज्ञानांजनाने नाहीसे करून ज्ञानदृष्टी देतात, तेच गुरु असं म्हटलेलं आहे. **'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वर:। गुरु साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नम: ॥'** गुरु म्हणजे ब्रह्मा, विष्णु, महेश्वर यांची त्रिमूर्ति असं मानलं गेलेलं आहे. ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरी'सारखा यावत्चंद्र दिवाकरौ चिरंजीवी ठरलेला ग्रंथराज निर्माण केला. एवढं त्यांचं श्रेष्ठ ज्ञान असूनही त्यांनी ज्ञानेश्वरीत जागोजागी 'निवृत्तीदासु' असा आपल्या गुरुचा गौरवपूर्वक उल्लेख केलेला आढळतो. ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात 'गुरुचं महत्त्व' व 'गुरुभक्ति' यावर ओव्या क्र. ३६८ ते ४५८ पर्यंत जवळजवळ ९० ओव्या आहेत. **'गुरुक्षेत्र गुरु देवता। गुरु माये गुरु पिता। जो गुरुपरौता। मार्गु नेणे॥'** **'गुरुविन कौन बतावे बाट'** असं महात्मा कबीरांनी म्हटलेलं आहे. नामदेव म्हणाले, **'सद्गुरुरायें कृपा मज केली। निजवस्तु दाविली माझी मज॥'** एका कर्नाटकी संत महिलेनं म्हटलेलं आहे - **'सद्या सद्गुरुविन दयदिंद एल्लानु मै मरतनें।'** (सद्गुरुंच्या कृपेमुळेच माझ्यातला 'मी'पण निघून गेला; माझं देहभान लयाला गेलं.) याबाबतीत सर्व संतांचं एकमत आहे. एक संस्कृत सुभाषित सांगतं - **'दुर्लभो विषयस्त्यागो दुर्लभं तत्त्वदर्शनं। दुर्लभा सहजावस्था सद्गुरो: करुणांविना॥'** सद्गुरुंची कृपा झाल्याविना मानवाची विषयापासून मुक्तता होत नाही, आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा बोध होत नाही, आत्मज्ञान प्राप्त होत नाही. या सर्व बाबींची तोटकाचार्यांना जाण असल्यामुळेच ते आपल्या गुरुदेवांना विनंती करतात वारंवार - 'माझं रक्षण करा' या शब्दांत.)

**विदिता न मया विशदैककला**
**न च किंचन कांचनमस्ति गुरो।**
**द्रुतमेव विधेहि कृपां सहजां**
**भव शंकर देशिक मे शरणम्॥८॥**

''गुरुदेव, मी अत्यंत अज्ञानी आहे. शास्त्राचा अंशही मला परिचित नाही. या अज्ञान्यावर कृपा करा, स्वामी, मी आपल्याला काय अर्पण करू शकेन? माझ्यापाशी कांचन, धन, द्रव्य असं काहीही नाही. पण महाराज, आपण कृपाळू आहात; दया करणे, कृपा करणे हाच तुमचा स्वभाव आहे. आपल्याला मी अनन्यभावाने शरण आलो आहे. स्वामी, माझं रक्षण करा.'' (भक्ती कशी असावी याचं हे स्तोत्र म्हणजे एक आदर्श प्रतीक आहे. ज्ञानदेव विवरण करतात - **'पैं गा भक्ति एकु मी जाणें। तेथ साने थोर न म्हणे। आम्ही भावाचे पाहुणे। भलतेयां॥ अनन्यगतिकें चित्तें। चिंतति मातें सांते। ते सेविति तेयांतें। मी चि सेवी॥'** अशी ईश्वराची आपल्या भक्ताबद्दलची अपेक्षा असते. हा लहान, तो मोठा असा दुजाभाव भगवंताच्या ठायी नसतोच. तो भावाचा भुकेला आहे. **'पत्रं पुष्पं फलं तोयं योमे भक्त्या प्रयच्छति। तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मन:॥'** असं गीतेत म्हटलेलं आहे. एखादं पान, फूल, फळ, निदान पाणी अर्पण केलं, तरी भगवंताची कृपा प्राप्त होते. 'देव **तुज मागे आवडीची भक्ति। विश्वासोंरी प्रीति भावबळें॥'** असं तुकारामांचं वचन आहे. अर्थात् 'संत तेचि देव। देव तेचि संत।' अशी संताबद्दलची व्याख्या असल्याने संत-सत्पुरुषांची वृत्ती अशीच असते. हे तोटकाचार्यांना मनोमनी ज्ञात असल्यामुळे ते या स्तोत्राच्या अंतिम श्लोकांत अशी निर्व्याज्य भक्तीने प्रार्थना करतात.)

वाचकहो, केवळ आठ श्लोकांचं हे स्तोत्र अत्यंत भावपूर्ण आहे. शिष्याने गुरुबद्दल कोणत्या प्रकारची भावना मनात बाळगावी, गुरुकडून अपेक्षा कोणती करावी, त्यामध्ये अनन्यभक्ती कशा स्वरूपाची असावी याचं हे स्तोत्र एक प्रतीक आहे. या स्तोत्रांमध्ये प्रत्येक श्लोकाचा अंतिम चरण एकच आहे - 'भव शंकर देशिक मे शरणम्.' संपूर्ण स्तोत्र प्रासादिक व अत्यंत सुलभ आहे. त्यामध्ये सांगितिक लय आहे मोठ्या आकर्षणाची. पाठांतर सुलभपणे होऊ शकतं. आपल्या हाताने एक समन्वयी 'ठेका'-'ताल' धरून हे स्तोत्र म्हणण्याचा प्रयत्न केला, तर मनाला ब्रह्मानंद प्राप्त झाल्याविना राहणार नाही. संस्कृत भाषा कठीण आहे समजायला या चुकीच्या कल्पनेत आपण किती अमूल्य अशा आनंदाला मुकत चाललो आहोत याची कल्पना जरूर येईल. आदर्श काव्य संस्कृतमध्येच आहे. त्याची अनुभूती अभ्यास केल्याविना कशी येणार? जे जुनं असतं तेच बाव्वनकशी सोनं असतं. केवळ अवघड अवघड म्हणून त्याचा बाऊ करण्यात काहीही हंशील नाही; उलट आपणच एका निस्सीम आनंदाला आज मुकत चाललो आहोत - हेच आपलं भीषण दुर्दैव!



# संतांची नामसाधना

- डॉ. अशोक कामत, पुणे.

**'नाम' म्हणजे ईश्वरतत्त्वाचे स्मरण. त्या सदासर्वत्र व्याप्त शक्तीची विनम्र होऊन आठवण करणे. नामस्मरण हे कर्मकाण्ड नव्हे. ती एक साधना आहे. आपल्या संतांनी आचार्यांप्रमाणे तर्काचा मार्ग न स्वीकारता प्रेम-सद्भावाचा स्नेहपथ आपला म्हटला. हे संत समाजाच्या साऱ्या स्तरातील, गावगाड्यातील होते. त्यांचा जीवनानुभव उदंड होता. त्यांनी ईश्वरतत्त्वाचे उदात्तीकरण केले. देव आपल्यातच असतो, तो आपल्या परीने प्रत्येकाला अनुभवता येतो, हे स्वतः अनुभवले आणि इतरांना दाखवून दिले. दुसऱ्या बाजूने त्यांनी देवकल्पनेचे आणि साधनेचे सुलभीकरण केले. त्यासाठी त्यांनी प्रथम नामदेवरायांच्या अभंगांतून नामसाधना सांगितली. त्या नामसाधनेची ही संक्षिप्त ओळख...**

देहावरील आसक्ती विषयवासनेकडे होणारी प्रवृत्ती ही हळूहळू पण निश्चितपणे घालविता येते आणि आत्म्यावर संस्करणे करीत जीव ब्रह्मपदाला पोहोचू शकतो, अशी संतसत्पुरुषांची दृढ श्रद्धा आहे. काहींची तशी प्रत्यक्ष अनुभूतीही आहे. जीवावस्थेत विषयचिंतनामुळे माणसाला अनात्मदशा प्राप्त होते. या दशेवर मात करण्याचे सुलभसोपारे साधन म्हणजे नामचिंतन अथवा नामस्मरण असे संत वारंवार आपल्याला सांगतात.



वारकरी बांधव रोज नियमाने 'हरिपाठ' वाचतात. 'हरिमुखे म्हणा' 'हरिमुखे म्हणा' अशी हेतुपूर्वक आवृत्ती करीत ज्ञानेश्वरमहाराज त्या हरिपाठातून आपल्याला सांगतात, 'पुण्याची गणना कोण करी ?'

**देवाचिये द्वारी उभा क्षणभरी ।**
**तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥**

**हरिमुखें म्हणा, हरिमुखें म्हणा ।**
**पुण्याची गणना कोण करी ॥**

**असोनि संसारी जिव्हे वेगु करी ।**
**वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥**

**ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणे ।**
**द्वारकेचे राणे पांडवां घरी ॥**

ज्ञानदेवांनी येथे केलेली रूपककल्पना अद्भुत आहे. त्यांनी नामाला 'देवाचे द्वार'च मानले आहे. केवळ या दारापर्यंत जरी जाता आले तरी पुष्कळ होते. जो या नामद्वारात क्षणभरही उभा राहतो, त्याला चारही मुक्ती साध्य होऊ शकतात, अशी त्या नामजपाची विलक्षण शक्ती असते.

ज्ञानदेवांनी भागवतधर्माचे पायाभरण केले. नामदेवरायांनी या मंदिराचा विस्तार केला. नाथांनी वारकरी बहुजन आंदोलनाला सामूहिक साधनेचे स्वरूप दिले. ही साधना मुख्यतः नामचिंतनावर आधारलेली होती.

पंढरीची वारी ही या देशातील एक फार मोठी सामूहिक नामसाधना आहे ! या वारीत कोणी उच्च नाही. कोणी छोटा नाही. सारे सारखे म्हणून एकमेकांच्या पायावर डोई ठेवायची. एकमेकाला आलिंगन द्यायचे. यांचा देवही माऊली. यांचे संतही माऊली. देवाचे नाव घ्यायचे आणि सन्मार्गावर पावले टाकीत राहायचे. केवळ आत्मज्ञान नव्हे तर आत्मभान त्याहून अधिक महत्त्वाचे, हे समजून घ्यावयाचे. आपापले कार्य-कर्तव्य करायचे. फळाबद्दल आग्रह नाही धरायचा. आसक्ती तर मुळीच ठेवायची नाही.

## नाम नि देव भिन्न नाही !

नामदेवरायांच्या मते नाम आणि ईश्वराचे प्रत्यक्ष रूप एकच होऊन जातात:

**नाम तेंचि रूप, रूप तेंचि नाम।**
**नामरूपा भिन्न नाहीं नाहीं ॥**

**आकाराला देव नामरूपा आला।**
**म्हणोनि स्थापिले नाम वेदी ॥**

नामाला वेदप्रतिष्ठा देण्याची नामदेवरायांची दृष्टी विलक्षण म्हणायला हवी. भक्तीचे सुलभीकरण आणि देवकल्पनेचे उदात्तीकरण ही नामदेवांनी भागवतधर्माला दिलेली मोठी देणगी होय. नामाचे हे महत्त्व पुढे एकनाथ महाराजांनीही स्पष्ट केले. त्रैलोक्याला व्यापून उरणारे जर काही असेल तर ते ईश्वराचे नामच आहे. तेच अविनाशी म्हणून नित्य त्याचा आधार आवश्यक. नाथ म्हणतात :

**नांदतसे नाम आकाशपातळी।**
**सर्व भूमंडळी व्याप्त असे ॥**
**पाताळ भेदोनि व्याप्त ठेले पुढे।**
**नाही त्यास आड कोठें काही ॥**

तुकोबारायांनी ज्ञानदेव-नामदेव-नाथांचा हा नामविचार अत्यंत प्रभावी शब्दात मांडला आणि अभंग कीर्तनातून लोकमानसात रूजविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी स्वत: अविनाशी नाम नित्य आपल्या कंठी धरून ठेविले आहे, कारण एक हरिनाम सोडले तर सर्वकाही काळाने ग्रासून टाकले आहे, याची त्यांना जाणीव झालेली आहे. म्हणून ते म्हणाले :

**अवघाचि आकार ग्रासियेला काळे।**
**एकचि निराळें हरिचें नाम ॥**
**धरूनि राहिलों अविनाश कंठी।**
**जीवन हे पोटी सांठविले ॥**

या साधनेमुळेच 'अणुरेणुयां थोकडा तुका आकाशाएवढा' अशा महत्पदाला महाराज पोहोचू शकले.

## संतांची खरी साधना

नामस्मरणाची ही महती जशी तुकोबांसारख्या वारकरी सत्पुरुषाने गायिली तशीच ती त्यांच्याच काळात झालेल्या समर्थ रामदासांसारख्या धारकरी समाजपुरुषानेही कथन केली आहे. रामदास हे प्रयत्नांची महती सांगणारे आणि आलस्य हा सर्वात मोठा दुर्गुण मानणारे होते. पण नाममाहात्म्य सांगताना तेही म्हणून गेले आहेत :

**रामनामकथा गंगा। श्रवणें पावन करी जगा ॥**
**तिसी प्रेमपूर आला। शंकरहृदयी सामावला ॥**
**रामदासी माउली। आळशावरी गंगा आली ॥**

रामनाम ही गंगाभागीरथीच आहे. तिच्या ठिकाणी कुणालाही मज्जाव नाही. अगदी (माझ्यासारखा) आळशीसुद्धा या नामगंगेत सुस्नात होऊ शकतो. अर्थात् हे म्हणणे विनयाचे आहे. समर्थ आळशी तर नव्हतेच. पण कुणी आळशी असलाच तर त्याने किमान नाम घ्यावे, आणि तरून जावे, असे त्यांना सांगायचे आहे!

ज्ञानदेव-नामदेव आणि पुढे नाथ-तुकाराम यांच्यासारख्या दीपस्तंभांमुळे मराठी प्रदेशात भक्तीचा प्रवाह जसा अखंड आणि विमल स्वरूपात राहिला तसाच रामदासांसारख्या व्यक्तित्वसंपन्न सत्पुरुषांमुळे समर्थ संप्रदायातही टिकला. मन्मथशिवलिंगासारख्या साधुपुरुषांमुळे वीरशैव पंथातही वाढला. भक्तीच्या अशा विस्तृत आणि वैविध्यपूर्ण क्षेत्रात नामस्मरण हीच संतांनी सांगितलेली खरी साधना होती.

## हरि नाव हीरा !

कर्मकाण्ड, बाह्यावडंबर, शब्दज्ञान, पाण्डित्य प्रदर्शन, विशिष्ट ज्ञातीचे धार्मिक वर्चस्व यापासून जनसमाजाची सोडवणूक करीत, भगवद्‌भक्तीच्या प्रांतात कुणाचेही कुणावर दडपण असता कामा नये, अशी क्रांतीची प्रेरणा नामदेवांनी उत्तरेमध्ये यात्रा करून दिली. ते म्हणाले :

**हरि नाव हीरा, हरि नाव पाती।**
**का करौं जाती, का करौं पाती ॥**

हरि, माधव, मुरारी, कन्हैय्या, गोविंद वा विठ्ठल यांच्या नामसंकीर्तनाला काळवेळ वा मुहूर्त नको. मुक्तीदेखील नामानेच मिळेल. निराकार भगवंत जेव्हा साकार बनला, तेव्हा भक्तीने त्याची नामरूपात स्थापना केली. नामसाधना हा सगुणनिर्गुण कल्पनांना जोडणारा दुवा असतो, हे नामदेवरायांनी सांगितले. यामागे सर्वसामान्य जनांचा आत्मविश्वास वाढावा, खऱ्या ईश्वराच्या अर्चनेसाठी त्यांना अवघड मार्गाचे भय राहू नये, आणि कुण्या मधल्या हस्तकांची आवश्यकताच भासू नये, अशी समाजसापेक्ष दृष्टी होती. या दृष्टीची उत्तरेत त्याकाळी आत्यंतिक गरज होती.

नामदेवांच्या नामवेदाची हिंदी पदेही अत्यंत प्रासादिक उतरली आहेत :

**हरि नांव हीरा हरि नांव हीरा।**
**हरि नांव लेत मिटै सब पीरा ॥**

**हरि नांव जाति, हरि नांव पाति।**
**हरि नाव सकल जीवन में क्रांति ॥**

**हरि नांव सकल सुखन की राशि।**
**हरि नांव काटै जम की फांसी ॥**

**हरि नांव सकल भुवन ततसारा।**
**हरि नांव नामदेव उतरै पारा ॥**

## नाम आणि स्मरण

महात्मा कबीरदास हे नाथपूर्वकाळातील उत्तरेत गेलेल्या नामदेवरायांच्या नंतर त्यांना अनुसरून 'संतमत' मांडणारे. उत्तरेतील थोर तत्त्वचिंतक आणि श्रेष्ठ कवी. त्यांचा तुकोबांच्या प्रभावी वाणीवर प्रभाव दिसतो. त्यांनी नाममहती अत्यंत रमणीय शब्दात मांडली आहे. त्यांची 'साखी' अर्थात् साक्ष्य अशी :

**सभी रसायण हम करी, नहीं नाम सम कोय।**
**रंचक घटमें संचरै, सब तन कंचन होय ॥**

अर्थात् आम्ही सारे उपाय केले. औषधी आणि अनेक मात्रादेखील केल्या म्हणा ना! पण अखेर नामौषधीला पर्याय काही मिळू शकला नाही. अगदी कणभर जरी नाम घेतले तरी साऱ्या तनामनाचे सोने होऊन जाते.

पण हे नाम घ्यावे कसे? सारे लक्षचित्त एकाग्र झाले पाहिजे. बरेच लोक जिव्हेने नामोच्चार करतात. पण त्याचवेळी त्यांचे मन मात्र चारी दिशांना भटकत असते. हे काही नामस्मरण नव्हे.

**माला फेरत जुग भया मिटा न मनका फेर।**
**करका मनका डारिके मनका मनका फेर ॥**

कित्येक मंडळी एखाद्या कर्मकाण्डासारखा नामजप करतात. त्यामुळे काहीच त्यांना साधत नाही. त्यांचे मन तसेच अशांत राहते. म्हणून कबीरदासांची सांगी आहे : हातातील मणिमाळा महत्त्वाची नाही. मनाची मणिमाळा जपणे हे अखेर हितकारक ठरेल!

नाम हे शरीर आणि मन, परिशुद्ध करणारे असते. त्यामुळे आत्मविश्वास तर वाढतोच, पण सामान्य माणूस असामान्यत्वाकडे सहज वाटचाल करू लागतो. मग त्याची जातजमात कोणतीही असो. त्याला अक्षरओळख असो नसो.

तुकोबारायांनी अशीच नामाची अनेक वैशिष्टचे विशद केली आहेत. 'नाम सर्वकाळ शुभदायक' ठरते. इतर साधनांप्रमाणे त्याला विधिनिषेध असत नाही. नामौषधी इतर औषधीकाढ्यासारखी नव्हे. ती गोड असते. शिवाय, नामासाठी '**न लगती सायास, जावे वनांतरा। सुखे येतो घरां नारायण.**' नामसाधना ही नरनारायणत्वाची वाटचाल आहे!

नाम अर्थात ईश्वरतत्त्व. 'रामनाम' म्हटले तर त्यातील 'राम' हा अवतार नव्हे. कबीरदासांनी फार चांगल्या रीतीने हे प्रतिपादन केले आहे –

**दशरथसुत तिहुँ लोक बखाना।**
**रामनामका मरम है आना ॥**

दशरथाचा पुत्र राम आणि त्याची कहाणी तिन्हीं लोकात वर्ण्यविषय आहे. पण रामनाम हे त्याहून मोठे आहे. वेगळे आहे. त्याचे मर्मच निराळे आहे.

नाम आणि स्मरण हे दोन शब्द एकत्र उच्चारले जातात. पण मुळात त्या दोन वेगळ्या संकल्पना आहेत. नाम अर्थात् भगवत्तत्त्व आणि त्याची नित्य जाणीव वा स्मृती. म्हणून कबीरदास 'मनका मनका फेर' मनाची मणिमाळा जपायला सांगतात. नामोच्चार हा आठवून वा मोठ्याने करायचा नसतो. तो मनोमन प्रतिक्षिप्त क्रियेसारखा करायला हवा. आपापली कर्तव्यकर्मे पार पाडताना अगदी सहज तो व्हावा.

नामदेव-कबीरदासांचा निर्गुण संतमताचा वारसा गुरु नानकदेवांनी मोठ्या सामर्थ्याने स्वीकारला. सिक्ख मतामध्ये अवतारवाद आणि मूर्तिपूजन मान्य नाही. पण ईश्वरतत्त्व मानले आहे. त्याचे त्यांना नामस्मरणही महत्त्वाचे वाटेले आहे. **'सुमिरन कर ले रे मना, यह उमरिया बीती जाए'** हे नानकदेवांचे एक भजन सर्वश्रुत आहे. त्यांचा मुख्य ग्रंथ 'जपुजी.' त्याला आचार्य विनोबा भावे यांनी यथार्थपणे 'शिखांचा हरिपाठ' म्हटले. गुरु नानकदेवांनी आपल्या शिष्यसमाजाला दिलेला बीजमंत्र असा होता :

**इस ओंकार सतिनामु!**
**करता पुरखु! निरभऊ, निरवैरू!**
**अकाल मूरति, अजूनि, सैभं,**
**गुरु प्रसादि, जपु!!**

तो एक आहे. त्याचं नाव सत्य. तो सत्य, नित्य, शुद्ध. आदिपुरुष! सृजन करणारा आणि हर्ताही तोच आहे. तो निर्भय, निर्वैर, नित्य, शाश्वत, कालातीत, त्याला जन्म नाही. मरण नाही. तो स्वयंप्रकाशी. सारे ज्ञान, जीवन यांचा तो मूळ झराच आहे. **गुरुकृपेने हे समजून घ्यावे. मग नित्य त्याचा जप करावा. त्याचे नामस्मरण करीत जगावे.**



# साईभक्त उद्धवेश

*(मागील अंकावरून)* **(भाग २ रा)** **- के. डी. गडकरी**

गौरव करून पिता श्री साईश यांची अभिवादनादिक पूजा करून खणावयांस आरंभ केला. तिसावे दिवशी रात्री अकरा वाजून ११/१२ मिनिटांवर पाणी अचूक, अफाट, सुंदर शुभवर्ण लागले. रेताड मुलुख, पाण्याचा आसपास संचय नसताना जल आले ही परम पिता श्री साईश यांचीच कृपा. पाणी इतके लागले की बांधकाम करणे कठीण झाले. तरीपण एकवीस फुटापर्यंत खोली झालीच पाहिजे हा निर्धार. पाणी सदोदित काढावे, मग परत कामारंभ करावा ह्याप्रमाणे दीड पुरुष बांधकाम होईपावेतो स्थिती होती. वीस फुटांवर काळा दगड लागला. तीन वर्ष, अकरा महिने, अकरा दिवस काम चालू होते. पूर्ण विहीर वरपर्यंत दगड, सीमेंट कॉंक्रीटने बांधली असून प्रत्येक ऐरणीवर रुद्राची एकादशमी करविली व ''श्री शामसाई सदनांगभूत श्री रेवा कूप'' हे नाव श्री शामबाबांनी ठेवले.

वाराणसी पपी या नावाची एक आज्ञाधारक कुत्री श्री शामबाबांजवळ होती. तिच्या जन्माची नोंद श्रीशामबाबांनी करून ठेवली आहे, चैत्र शुद्ध ९, शके १८५५, दुपारी १२॥ वाजता (ता. ४ एप्रिल १९३३). खरा भक्त, मग तो मनुष्यप्राणी असो अगर पशु असो तो सद्गुरुंच्या सान्निध्याचा भुकेला असतो. सद्गुरुंच्या जवळच त्यांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या भूमीतच देहविसर्जनानंतर एक रज:कण होऊन राहाण्याची इच्छा, हव्यास त्यांस असतो. दयाघन, सद्गुरु त्याची इच्छा पूर्णही करतात. पण असे महत्भाग्य फारच थोड्यांच्या नशिबी येते. वाराणसी पपी ही एक अशीच भाग्यवान ठरली. तिची निस्पृह सेवा, समर्पण परम पिता श्री सांईश चरणी रुजु झाले. तिच्या इच्छामृत्युची जाणीव श्री शामबाबांना झाली, आणि ती त्यांनी पूर्ण केली. भाद्रपद शुद्ध एकादशी, शके १८६३ तदनुसार बुधवार, दिनांक ३ सप्टेंबर, १९४१ या दिवशी श्री शामबाबांनी तिला आज्ञा केली की, ''पपी, आज तुला जायचे आहे. तयारी कर !'' त्याप्रमाणे तिने त्या दिवशी उपवास ठेवला. श्रीशामबाबांची आज्ञा घेऊन नर्मदा नदीवर स्नान करून येऊन सायंकाळी ७॥ वाजता परम पिता श्री सांईश यांचे दरबारात श्री शामबाबांचे मांडीवर डोके ठेवून देह सोडला. तिचा देह समाधीचे समोर वीस फुट खड्डा खणून त्यात ठेवण्यात आला आणि वरचे बाजूस श्री शामबाबांनी



तुळशी वृंदावन बांधले. या कामाकरता त्या काळी, म्हणजे इ. स. १९४१ मध्ये रु. ७५०/- खर्च आला. तुळशीवृंदावनाचे समोरील बाजूस एका शिळेवर वाराणसी पपीची तसबीर कोरून ''वाराणसी पपी; हुकमी मृत्यु। इच्छा मृत्यु ॥ ऐसा असावी पशु'' असे कोरून ठेवण्यात आले आहे. श्री शामबाबांनी त्यांचे ट्रस्ट पत्रात नमूद करून ठेवले आहे की, येथे राहणाऱ्या व्यक्तीने वाराणसी पपीचे जे स्मारक आहे तसे करण्याची धमक असेल तरच पशुपक्षी येथे पाळावे. पण त्या पशुला हुकमी मरण व आज्ञाधारकपणा असेल तरच पाळावे अगर पाळू नये. या तुळशीवृंदावनाला लागूनच दीपस्तंभ फाल्गुन वद्य ६, शके १८६४ व ध्वज स्तंभ चैत्र शुद्ध १, शके १८६४ मध्ये (इ. स. १९४२) बांधण्यात आले.

मुख्य इमारत इ. स. १९३६ मधे झाली. सिद्धासनाचे उत्तरेकडे जी खोली आहे तेथे श्री शामबाबांची स्वत:ची बसण्याची व्यवस्था होती. एक छप्परी पलंग व एक टेबल. आजूबाजूस त्यांच्या स्वत:च्या शेगड्या असत. भक्तमंडळी प्रथम सिद्धासनात समाधीसमोर उदबत्ती लावून, उदी घेऊन

दंडवत घालीत. मग बाजूचे खोलीस श्री शामबाबांना नमस्कार करून पलंगाचे बाजूस बसत. समाधीमंदिरात परमपिता श्री सांईश यांचे समोर श्री शामबाबांना नमस्कार करण्यास ते स्वत: मनाई करीत असत. ''हे स्थान बडया बाबांचे आहे. येथे तेच सर्वस्व आहेत.'' असे ते म्हणत. परम पित्याबद्दलचा आदर अशा प्रकारे ठेवला जात असे. पलंगापाशी बसल्यावर ते आलेल्या व्यक्तींची विचारपूस करावयाचे, स्वत: चहा करून सर्वांना द्यावयाचे. भक्तांची गाऱ्हाणी ऐकून त्यांना त्यांच्याच भाषेत समजेल असा उपदेश दिला जाई. गुरुचरित्र, त्यातील विशिष्ट अध्याय, गीता, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, शिवलीलांमृत आदि ग्रंथांची पारायणे प्रत्येकाला साधेल असे सांगितले जावयाचे. परंतु परम पिता श्री सांईश यांचे एकतरी भजन नित्य झालेच पाहिजे हे सतत सांगितले जावयाचे. 'भजन करा' हा उपदेश. ''मी एक साईचे वेडे पोर आहे. मला काय कळते ? त्या साईशाचे गुणानुवाद गावे, त्यांचेच कृपेने सर्व काही जे ठीक होणार ते होईल. मला विसरलात तरी चालेल पण प्रभू भगवंत श्री साईंना विसरू नका. त्या गुरुमाऊलीसच नित्य भजा. म्हणजे याद ठेवा. दयाही तो करतोच'', असे श्री शामबाबा सतत म्हणत असत.

संत पुरुषांना त्यांच्या शुद्ध, प्रेमळ, अंत:करणपूर्वक अनन्य भक्तीच्या योगाने परमेश्वरदत्त अशा काही सिद्धी प्राप्त होत असतात. परंतु त्या सिद्धीच्या जोरावर चमत्कारादी करामती दाखवून जनतेला भुलवणारे खरे संत, सत्पुरुष नव्हेत. थोर अवतारी सत्पुरुष ज्यावेळी संतपदाला पोहोचतात त्यावेळी ते एक प्रकारे सहज सिद्धीस पोहोचत असतात. अनन्य भक्तीच्या जोरावर त्यांना सामर्थ्य प्राप्त झालेले असते. त्यांच्या सामर्थ्याची किल्ली आहे. ती किल्ली तुम्हीच शोधून काढा व ती एकदा हाती आली म्हणजे चमत्कारांच्या गोष्टींचा चमत्कार नाहीसा होऊन त्या गोष्टी स्वाभाविक वाटू लागतात. खरे थोर संत जाणूनबूजून करामती दाखविण्याच्या गोष्टी करीत नसतात. पण जनतेला उपासना मार्गास लावताना अशा गोष्टी सहज स्वाभाविकपणे त्यांच्याकडून होतात. आजपावेतो अनेक संतांकडून तशा गोष्टी घडल्या आणि घडताहेत. जनउद्धार करताना संसाराच्या बंधनात सर्वस्वी जखडले आहेत अशा बहुजन अज्ञानी लोकांशी संतांचा संबंध विशेष येतो. अशाच लोकांना उपदेशामृत पाजून भक्तिपूर्वक उपासनेला लावावयाचे असते. सर्वसाधारण संसारी लोकांचे रडगाऱ्हाणे साधारणपणे एकच असते व त्यामुळे संतांचे मार्गदर्शनाचे प्रकारही पुष्कळ वेळा एकच प्रकारचे असतात. श्री शामबाबाही अशाच संतपदाला पोहोचले होते व त्यांच्या चमत्कारांचे व परमपिता सद्गुरु श्री साईबाबांचे नावाने दिलेल्या प्रसादी उदीचे अनुभव अनेकांना आले. भक्त मेळावा दिवसेंदिवस वाढतच गेला. त्यात गरीब, श्रीमंत असा भेदभाव नव्हताच. सर्व प्रकारची मंडळी मुलाबाळांसकट जमत असत. स्वदेहाची, कष्टांची पर्वा न करता सर्वांशी प्रेमाने बोलणे, खाणे, पिणेची चौकशी करणे हा नित्याचा क्रम असे. सर्वांसाठी दया आणि प्रेमाने पूर्ण भरलेली अशी ती ज्ञानवंत मूर्ती होती.

श्री शामबाबांची शिस्त मात्र खूप कडक ! सर्व लहानसहान कामे वेळच्या वेळी झालीच पाहिजेत, हा दंडक सर्वांना सारखाच लागू होता. साधे भांडेसुद्धा स्वच्छ घासून पुसून जागच्या जागी ठेवलेच पाहिजे, रात्रीचे कंदील कोठे व कसे ठेवायचे, वात किती मोठी असावी या गोष्टीतसुद्धा ते जातीने लक्ष घालीत असत. अव्यवस्थितपणा त्यांना मुळीच खपत नसे. संसार, व्यवहार दक्षतेपूर्वक उत्तम रीतीने नीटनेटका कसा करावा हे श्री शामबाबांकडून शिकावे. श्री सदनातील वस्तु अंधारातही अचूक सापडावयाचीच. ते स्वत: नियमित रोजनिशी लिहीत असत. एकामध्ये पै अन् पैचा रोजचा खर्च, अन् दुसऱ्यात दर दिवशीचा पूर्ण तपशील आल्या-गेल्या व्यक्तींची माहिती वगैरेचे सविस्तर वर्णन असे. तिसरा, पत्रव्यवहार ! श्री शामबाबांचा पत्रव्यवहार देश-विदेशात खूप मोठा होता. पत्र मिळाले म्हणजे ते केव्हा, किती वाजता हाती पडले, पोस्टाचा शिक्का कोणत्या तारखेचा होता, हे ते नमूद करून ठेवीत. त्यांचे उत्तर केव्हा व काय पाठवले हेही लिहिलेले सापडते. एक वेगळी स्मरणवही असे. त्यात कोणास काय पत्र लिहिण्याविषयी सूचना द्यावयाच्या, कोणाकडून काय करवून घ्यावयाचे याची नोंद असे. काही पत्र ते स्वत: लिहीत असत, तर काही कोणाकडून लिहून घेऊन, वाचून ते फक्त सही करीत असत. श्री सदनात एक वाचनालय असावे, ही श्री शामबाबांची योजना होती. त्याकरिता अनेक प्रकारचे धार्मिक ग्रंथ, पोथ्या, लहान-मोठी पुस्तके तर मागवीत असतच, पण चरित्रे, काव्यसंग्रह ऐतिहासिक पुस्तके, सुलभ विश्वकोष, हंस, कल्याण, सह्याद्री आदि मासिके, साप्ताहिके, केसरी पेपर, बागाईतीवरील पुस्तके, औषधोपचारावरील आयुर्वेदिक पुस्तके आदि विविध प्रकारच्या मराठी, हिंदी व इंग्रजी अशी ७५०-८०० पुस्तकांनी एक मोठी अलमारी खच्चून भरली आहे. विशेष म्हणजे प्रत्येक पुस्तक केव्हा, किती मूल्य देऊन मागवले, येथे कोणत्या तारखेस दाखल झाले यांची नोंद प्रत्येक पुस्तकांवर स्वत:चे हाताने केली आहे. तसेच, ते पुस्तक केव्हा, कोठून बाईंडिंग करून आणवले, त्यास किती पैसे दिले हेही लिहिलेले आहे. श्री सदनातील पुस्तके व ग्रंथ सदनाचे बाहेर जाता कामा



नये हा दंडक अजूनही पाळला जातो.

श्री शामबाबा सदनाचे बाहेर कधीही गेले नाहीत. त्यांची सर्व कामे बसल्या जागेवरूनच होत असत. त्यांचे पश्चात् श्रीसदनाची व्यवस्था कशी असावी या गोष्टींची तपशीलवार माहिती लिहून, नियमावली तयार करून एक ट्रस्ट पत्र तयार केले. ते ट्रस्ट पत्र खांड्याचे सब रजिस्ट्रार यांचे कोर्टात ता. २२ सप्टेंबर, १९४८ रोजी रजिस्टर्ड केले. त्याकरिता श्री शामबाबांनी दोन अटी ठेवल्या. एक "मी येथून (श्री सदनातून) बाहेर जाणार नाही" व दुसरी "अंगठ्याचे निशाण कोठेही देणार नाही." या अटी मान्य असतील तरच रजिस्टर्ड करावे. या मान्य होऊन सब रजिस्ट्रार खेडीघाट येथे आले. त्या ट्रस्ट पत्रांवर लिहिले आहे, "Presented at private residence of Shri Udhwesh alias shyamdas Ranade, at Mortakka, Khedighat on 20-9-48 आणि T. M. (Thumb Mark) of Shri Udhwesh Ranade alias Shri shyamdas is exempted." संपूर्ण ट्रस्ट पत्र २९ पानांचे इंग्रजीमध्ये आहे. याचा मराठी व हिंदी अनुवादही आहे व त्यावर श्री शामबाबांची सही आहे.

श्री शामबाबांचे ट्रस्ट पत्रात त्यांनी लिहून ठेवले की, देहावसानानंतर श्री सदनास सव्य प्रदक्षिणा घालावी. नंतर देह सिद्धस्थानात जे अग्नीकुंड आहे त्यावर ठेऊन अग्नीस्पर्श करावा. समाधीभुयारात जी राख ठेवली आहे ती बाहेर काढून देहास समाधीभुयारात यम दिशेस पाय करून ठेवावे. सद्गुरु श्री साईबाबांनी प्रसादरूपी ज्या दोन कफन्या दिल्या आहेत त्यापैकी एक शरीरावर घालावी व नंतर देहास समाधीमध्ये चारी बाजूने राखेमध्ये ठेवावे. वरचे बाजूस शरीराचे मापाची संगमरवरी शिळा, जी त्यांनी आधीच मागवून आणून ठेवली होती ती बसवावी. समाधीची उंची चौथऱ्याच्यावर पाच इंच असावी. इ. स. १९४२ साली दादर, मुंबईचे पटवर्धन यांनी श्री शामबाबांच्या पायाच्या आकाराच्या शामवर्णाच्या पादुका करवून पाठवल्या होत्या त्या पादुका पायाकडील बाजूस बसवाव्या, त्या पादुकांसह समाधीची लांबी पाच फूट चार इंच असावी, कारण त्यांच्या देहाची उंची तेवढीच, म्हणजे पाच फूट चार इंच होती. श्रावण शुद्ध षष्ठी, दि. ८-८-१९५१ रोजी श्री शामबाबांनी इहलोकाची यात्रा संपविली. त्यांच्या निर्देशानुसार समाधीची सर्व व्यवस्था श्री सदनाचे तीन ट्रस्टी व भक्तमंडळींनी केली.

श्री शामबाबांनी जानेवारी १९५० मध्ये अखेरचा संदेश सर्व भक्तांना दिला तो पूर्ण संदेश मराठी, हिंदी व इंग्रजीमध्ये प्रसिद्ध केलेला आहे. त्यातील काही भाग येणेप्रमाणे :-

श्री शामसाई सदनात येणाऱ्या प्रत्येक आबाल वृद्ध, नरनारीसह समस्त श्री शामसाई मतानुयायी सान थोर कन्या पुत्रादिकांना श्री साईचे पोराची सांगी :-

ओवीवृत्त : आम्ही जाणार आमुचें ठायीं आम्हांवरी प्रेमाची पाखर असावी, माय भाई.

अभंगवृत्त : **भूत मात्रादि प्रेमेची पहावें।**<br>**सांईशी आठवावे हृदयीं सदा॥**<br>**सदा सांगे थोर सानादिक जीवा।**<br>**माझीयें साईंना सोडूं नका॥**

ओवीवृत्त : **साई नोहे एकदेशी।**<br>**सांई सर्व भूत निवासी॥**<br>**आब्रह्म कीटक मुंगी माशी।**<br>**साई सर्वत्र व्यापक॥**

अभंगवृत्त : **शाम सांगे सर्वा अखेरची ही वाणी ॥**
**जतन कराल तरी तराल भवतरणी ॥**

माझा देहपात झाला तरी माझेबद्दल खेद नसावा. हृदयी आठवावे पिताश्रीशी. प्रसंगानुसार कठीण आणि मधूर बोल बोलावे लागले व बोलावे लागतील, याबद्दल चिंता सानथोरांनी विषाद न धरावाच, पिता श्री साईश ऐसे म्हणत असत की, "मी मेल्यावर माझी हाडके बोलतील." ते थोर. त्यांची हाडके बोलतात व बोलतीलच. पण त्यांचे हे वेडे पोर असे सांगते की, दगडाला बोलावयास लावण्यासाठी माझ्या सर्व प्रेमियांनी हृदयकपाटाला खोलून जर सप्रेमे सांगाल किंवा बोलाल तरच हे माझे दगड बोलतील. हीच सांगी सर्वत्र सानथोरांना आहेच.

पिता श्री साई प्रभूंच्या इच्छेने यदाकदाचित काही काळपावेतो आयुमर्यादा वाढली आणि यदाकदाचित विधात्याने शरीराची मुदत आणखी जगण्याची लिहून ठेवली असली तरीही जे जे मी लिहिले तदुपरीच त्याप्रमाणे नमूद केले आहे. तोच माझा सिद्धांत स्पष्टपणे सततचा समजून सर्वत्र सजीवांनी त्यातील जे जे गोड वाटले ते ते मनी (मनात) प्रेमळपणे जतनसह मनन करूनच प्रभू श्रींच्या (साईंच्या) वात्सल्याची-प्रेमाची-याद (आठवण) ठेवून सुखाने राहण्याचा व वागण्याचा प्रयत्न केला तरच ते सततची दया ठेवतील. "जेथे याद तेथे दया" असतेच.

मानवी प्राणी हा त्यांची (परम पिताप्रभूंची) आठवण केव्हा करतो याची जाणीव नीट ठेवा. तुम्ही आपले स्वकर्माशी व कर्तव्याशी नीट हिपाजतीने सांभाळा, म्हणजे तो दयाघन तुमची योग्य ती खात्री करून देतोच. मोठ्यातला मोठा ताठा अहंकार ! त्या अहंकारापासून मनाला खेचून धरा. कारण अहंकारामुळेच मनाशी त्याज्य विकारमलीनता येते. म्हणूनच मलीनने त्यास लीन करा. मन लीन झाले की सर्व इंद्रियादि षड्विकार नमलेलीच असतात (राहतात) म्हणजे ताठरपणा नाहीसा होतो व त्यामुळे प्रभू गुरुस ती व्यक्ती प्रिय होते. मजवर जो तुम्ही भार टाकता व टाकणार तो मी प्रभू साईशांचे चरणावर सेवेत दाखल करून त्यांजवरच सोपविला आहेच. मी एक निमित्यमात्र मानवी कीटक आहे. श्री साईश सर्व सत्ताधारी सजीव आहेच व त्यांचेच कृपेने सकल भूतमात्रांचे कल्याण होत राहो, हीच माझी सदैव इच्छा. कर्तव्ये जी जी मानवी जीवांची ती ती सद्विवेके व नीट विचारे करून प्रभू साईश स्मरणानंदात तन्मय होवोत. "भार सर्व वाही प्रभूला" या वचनेस नजर देवोन त्या जगंनियंत्यास सदैव समर्पित जावोन नीट गोड वागावे. कवणावरि बोल न लावावे. "कर्तव्य ते आचारी" हे तत्त्व मनी बिंबवून श्री गुरुकृपेने तुम्ही आनंदात राहावे, हीच माझी मनीषा." "अन्न आच्छादन हे तो प्रारब्धाधीन" या संतांचे वचनानुसार तुम्ही भुके रहाणारच नाही व तुम्हा सर्वत्रांसी भगवंत मालिक प्रभू गुरु साईश सांभाळणारे पूर्ण समर्थ आहेत. ते सदैव सजीव आहेत, आम्ही निर्जिव आहोत, हे पूर्णपणे लक्षात असू देणे. कृपा व आशीर्वाद आहे. आठवण ठेऊन खूप भजन करा.

**॥ जेथे शाम तिथेची नित्य वसे हा सदा सुखे साई ॥**
**॥ म्हणूनी तद्दर्शनोत्पर जन प्रेमे त्या स्थळी मुदे जाई ॥**

**॥ सदा मागता दास शामा न साहे ॥**
**॥ सदा सांगता शाम दासासी पाहे ॥**
**॥ जनासी सदा सांगणे स्पष्ट माझे ॥**
**॥ भजावें पिता श्री साईश प्रेम काजे ॥**
**॥ जनापासी जो नित्य मागेच भीक ॥**
**॥ तया भीक ही ना मिळे, स्पष्ट ऐक ॥**
**॥ प्रभू साई राजा तुम्हां प्रार्थना ही ॥**
**॥ जगासीच नित्याप्रति तूच पाही ॥**

**॥ संतती संपत्ती ज्यासी पाहिजे ।**
**तयाने स्मरावे सुविचारे ॥**

**॥ सुविचार ठेवोनी साई पहावा ।**
**शाम सांगे सर्वा सततची ॥**


**॥ गोपालम् श्री धरंच, नारायणम् हरीम् सदा ॥**
**॥ अनंतम् वासुदेवंच, श्री साईश: नमोस्तुते ॥**
**॥ प्रात: काले पढे नित्यं, सायंकाले विशेषत: ॥**
**॥ माध्यानंच स्मरे वाणी, भुक्ति मुक्तिचं लभ्यते ॥१॥**

**॥ नंदिनी, नलिनी, सीता । दुर्गा दुर्गति हारिणी ॥**
**॥ जानकी याम महासाध्वी । चतुर्थी कन्यकाभवेत ॥**
**॥ शोभते शोभली माता । ममता मात्र ही सदा ॥**
**॥ पूर्णभावे वदा वाचा । आपदा नच बाधते ॥२॥**

ट्रस्ट पत्रातील काही प्रमुख गोष्टी खालीलप्रमाणे आहेत :

१) सदनाधिकाऱ्यांनी सततची श्री नीधि म्हणून १४४ रु. १४४ आणे १४४ पैसे इतकी रक्कम बिन कर्जाऊ श्री निधी म्हणून ठेवलीच पाहिजे. शिवाय ममपिता श्री साईशांचे पूज्य पुण्य संस्मृति दिन तिथी 'दसरा' विजयादशमीसाठी विनीयोग करण्यासाठी ८४ रु. ८४ आणे ८४ पैसे इतकी नेहमीची श्री निधी शिल्लक असलीच पाहिजे व इतकाच खर्चही सतत करणे. मात्र 'भीक' मागून न करणे.

२) प्रभू पिता श्री साईशांचे प्रेरणे, आज्ञेने, पण आपल्या



मताप्रमाणे निरनिराळी पीठे किंवा स्थाने स्थापन केली आहेत. त्या त्या स्थानापैकी कोणतीही व्यक्ती येथे आल्यास ती व्यक्ती आदरास पात्र आहे. पण त्याचा कोणत्याही प्रकारे 'श्री शाम साई' संस्थेशी अधिकार चालविण्याचा संबंध असता उपयोगी नाही. तसेच शिरडी संस्थान कमिटीशी अगर शिरडी गावातील व्यक्तीशी वरीलप्रमाणे वागावे.

३) श्रीमत् साईंच्या पुण्यतिथीबद्दल :- माझे पश्चातही झालीच पाहिजे. एकंदर खर्च-चालू २। शे रु. (सव्वा दोनशे रुपये) येतो. नाहीतर १३१।। एकशे एकतीस रु. अकरा आणे खर्च पूर्वी येत होता. इतर धान्यादिकांचा त्यात जमा नाही. फक्त पदार्थादिक, अनाथासह अस्पृशादिकांना प्रासादिक म्हणून संत, बैरागी आदि सर्वांना भोजनोत्तर सव्वा आणेप्रमाणे दिले जातात. माझे पश्चात निदान ८४।।= चौऱ्याऐंशी रुपये अकरा आणे झालाच पाहिजे. करावा. या रकमेत जेवढा श्रींचे पुण्यतिथीस विनियोग तेवढाच करणे, जास्त करणे न करणे समयानुरुपच टिकाऊ करावे. दिखाऊ करू नये.

४) येथे दर गुरुवारी ११ वाजेपासून ५ वाजेपावेतो श्री साईश सगुणोपासनेतील शिरडीस होणारे (माध्याहन आन्हिक) अष्टके, भजन, पूजन, पदे, गुणानुवाद, मीं (श्री शामबाबांनी) केलेल्या पदांदिक श्रींचे धावें वगैरे भक्तिभावाने म्हणावे (पूजोपचार करावा) व नंतर आरती मंत्रपुष्पादिक करावे. श्रींचे डावे बाजूस स्त्रिया व उजवे बाजूस पुरुष - सहाणेचा भाग सोडून - उभे रहावे.

५) सर्वांनी हे लक्षात ठेवावें, माझ्या समाधीचा अभिषेक, महापूजा वगैरे करणे असल्यास तो गुरुवारी न करता शुक्रवारी करावा. श्री साईशांचा अभिषेक महापूजा वगैरे गुरुवारी करावी. गुरुवार हा श्री साईशांचे अभिषेक, महापूजेकरिता व शुक्रवार हा माझ्या समाधीचे अभिषेक व महापूजेकरिता आहे.

देशकाल परिस्थिती बदलत गेली. त्या काळच्या परिस्थितीत व आजच्या स्थितीत बराच फरक आला आहे. तरीसुद्धा सद्गुरु श्री शामबाबांनी निर्देश दिल्याप्रमाणे श्री सदनाची व्यवस्था अव्याहत चालू आहे. ट्रस्टपत्राच्या नियमाप्रमाणे व त्यातील व्यक्त केलेल्या भावनेप्रमाणे सर्व कार्यवाही होत आहे. जनसमूह दिवसेंदिवस वाढतोच आहे. सर्वच बाबतीत समृद्धी आली आहे. श्री सदनात वर्षप्रतिपदा, श्रीरामनवमी, श्रावण शुद्ध पंचमी व षष्ठी हे दोन दिवस श्री शामबाबांचे पुण्यतिथी उत्सव, दसरा (विजयादशमी) हा सद्गुरु परम पिता श्री साईश यांचा पुण्यतिथी दिवस, व कार्तिक पौर्णिमा (दीपोत्सव) हे मोठे उत्सव नियमित साजरे होतात. इतर बारामासी सण जे श्री शामबाबांनी लिहून ठेवून साजरे करण्याविषयी सांगितले आहेत ते यथायोग्य होतात. पूजा, अभिषेक नियमित होतात. सवाष्णींचा माहेरी आलेल्या लेकी सुनांप्रमाणे खण-नारळ देऊन योग्य सन्मान केला जातो. या विषयी स्पष्ट निर्देश श्री शामबाबांनी देऊन ठेवले आहेत. महाप्रसाद, महानैवेद्य, नर्मदा नदीची पूजा, ओटी, दान आदि व्यवस्थित करण्याविषयी सदनाधिकारी सतत जागृत असतात. भक्तांच्या वसतीची पर्याप्त व्यवस्था कसल्याही प्रकारे मूल्य न घेता सदनाकडून केली जाते. सर्व भक्तवृंद हा एक कुटुंब या भावनेनी एकत्र येऊन उत्सवात सहभागी होतात. ''येथे सर्व सेवक आहेत, बाबा मालिक आहेत'', ही भावना ठेवूनच सर्व कार्ये होतात. असे हे 'श्री शामसाई सदन' परम पिता सद्गुरु प्रभू श्री साईश यांचे पुण्य पवित्र स्थान म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे.

**।। श्री शामसाई प्रभू सीताराम ।।**
**।। गोविंद गोपाल राधेशाम ।।**